SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

कुटुंब, मित्र आणि निसर्गासोबत एक अविस्मरणीय दिवस!
ह्या सुट्टीचा महाआनंद आणि धमालच धमाल....
आमरस पार्टी वनभोजन
रेन डान्स / बोटींग / पपेट शो
बर्डपार्क / झीप लाईन
ॲडव्हेंचर्स / वॉटर स्पोर्टस्
डॉ. कांकरियांचे साईबन
9112288622
9850500905 / 9096639368
डॉ. कांकरियांचे साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी.मागे, अहिल्यानगर

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १९.०६.२०२६ | अंक नं. ०६८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी
खरेदीवर पॉईंट
पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
₹ १९९/-*
2014 पासुन आपल्या सेवेत..
सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02




गंजबाजार, सराफ बाजारातील अतिक्रमणांवर कारवाई करताना महापालिकेचे अतिक्रमणविरोधी पथक. (छाया – धनेश कटारिया)

# मुख्य बाजारपेठेतील अतिक्रमणांवर महानगरपालिकेकडून कारवाई सुरु

नगर – शहरातील अत्यंत गजबजलेली व मुख्य व्यापारी पेठ असलेल्या गंज बाजार, सराफ बाजार परिसरातील रस्ते अतिक्रमणांनी व्यापले होते. त्यामुळे येथे पायी चालणेही अवघड झाले होते. हे अतिक्रमण हटविण्यात यावे, अशा तक्रारी वारंवार महापालिकेकडे करण्यात येत होत्या. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही हे अतिक्रमण हटविण्याच्या सुचना महापालिकेला दिल्या होत्या. अखेर १९ जून रोजी महापालिकेच्या पथकाने गंजबाजार परिसरात अतिक्रमणांविरोधात कारवाईची मोहिम उघडली. रस्त्यावर अँगल जोडून, टेबल मांडून करण्यात आलेले अतिक्रमण हातोड्याने तोडून काढण्यात आले. तसेच व्यापाऱ्यांनी लावलेल्या ताडपत्री देखील महापालिकेच्या पथकाने काढून टाकल्या.



गंज बाजारात दररोज मोठी वर्दळ असते. येथील रस्त्यावर टेबल मांडून विक्रेते रस्ते अडवितात. त्यामुळे या मार्गावर वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागते. तसेच पादचाऱ्यांना चालण्यासाठी पुरेशी जागा मिळत नाही. धक्के खातच येथून मार्गक्रमण करावे लागते, अशी येथील परिस्थिती आहे. हे अतिक्रमण काढण्यात यावे, अशी मागणी वारंवार नागरिकांकडून, काही व्यापाऱ्यांकडून सुरु होती. मात्र, महापालिका सातत्याने हे अतिक्रमण हटविण्यास दिरंगाई करीत होती. त्यामुळे या प्रश्नाकडे सराफ असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश लोळगे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे थेट तक्रार केली होती. पालकमंत्री विखे पाटील यांनीही महापालिकेला कारवाईच्या सुचना दिल्या होत्या. मात्र, तरीही कारवाई केली जात नव्हती. अखेरीस दैनिक नवा मराठाने १८ जून रोजी 'पालकमंत्री यांच्या पत्रालाही आयुक्तांकडून केराची टोपली', अशा मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध केले होते. त्यानंतर १९ जून रोजी महापालिकेच्या पथकाने गंज बाजारातील कारवाईला सुरुवात केली.

विक्रेत्यांनी रस्ते अडवले जाणार नाहीत, याची काळजी घ्यावी. कोठेही रस्त्यावर काहीही मांडून अतिक्रमण करु नये. ही कारवाई नियमितपणे सुरु राहणार आहे. त्यामुळे कारवाई टाळण्यासाठी व्यापारी, विक्रेते यांनी अतिक्रमण न करता व्यवसाय करावा, अशा सुचना अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ यांनी दिल्या. ही कारवाई महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार, अतिक्रमण प्रमुख आदित्य बल्लाळ आणि क्षेत्रीय अधिकारी नितीन इंगळे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली. या पथकाने कापड बाजार, भिंगारवाला चौक, तेलीखुंट चौक, मोची गल्ली, महावीर कॉर्नर, भुमकर गल्ली, गंज बाजार, भाजी मार्केट रोड आणि सोनार गल्ली येथे ही कारवाई केली. या मार्गांच्या कडेला असलेले लोखंडी टेबल, विक्रीसाठी ठेवलेल्या जाळ्या आणि रस्ता अडवणारे इतर साहित्य मनपाच्या पथकाने जप्त केले.

महापालिकेच्या या अचानक केलेल्या कारवाईमुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यापाऱ्यांचे आणि अतिक्रमणधारकांचे धाबे दणाणले आहेत. शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि नागरिकांना चालण्यासाठी जागा मिळावी, यासाठी ही मोहीम सातत्याने सुरु राहणार आहे.

# शहरातील अनधिकृत फ्लेक्स, बॅनर्सवर सलग दुसऱ्या दिवशी मनपाची कारवाई

नगर – रस्त्याकडेला दुकानांसमोर लावलेले जाहीरातींचे फ्लेक्स, बॅनर्स रहदारीला अडथळा ठरत असल्याच्या तक्रारी महापालिकेला प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार महापालिकेच्या पथकाने सावेडी परिसरातील फ्लेक्स, बॅनर्सवर कारवाईची मोहिम राबविली. सलग दुसऱ्या दिवशी ही कारवाईची मोहिम सुरुच राहिली.





१८ जून रोजी शहरातील मोठमोठे फ्लेक्स, बॅनर्स हटविण्यात आले होते. १९ जून रोजी सावेडीत फ्लेक्स, बॅनर्स हटविण्याची मोहिम राबविण्यात आली. या फ्लेक्स, बॅनर्समुळे शहराचे विद्रुपीकरण होत होते. त्यामुळे हे अनधिकृत जाहिरातींचे फ्लेक्स, बॅनर्स हटविण्याची मोहीम महापालिकेने अधिक तीव्र केली. मनपाच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने सलग दुसऱ्या दिवशी शहरात ही मोहिम राबवली. १९ जून रोजी सावेडी परिसरातील पदपथ, विद्युत खांबांवरील बॅनर्स आणि विविध चौकांमधील अनधिकृत फ्लेक्स, रस्त्यावर लावलेले दुकानांचे बोर्ड, राजकीय पोस्टर्स, विविध हॉटेल्सच्या जाहिराती, शाळा-महाविद्यालयांचे फलक आणि व्यावसायांसंबंधीच्या जाहिराचे बोर्ड मनपाच्या पथकाने काढून टाकून जप्त केले.

महानगरपालिकेने १८ जून रोजी ही धडक मोहीम सुरु केली होती. या मोहिमेचा दुसरा टप्पा १९ जून रोजी सावेडी परिसरात राबवण्यात आला. महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने रस्त्याकडेला दुकानांसमोर लावलेले फ्लेक्स, विविध विद्युत खांबांवर टांगलेले बॅनर्स आणि झेंडे काढून टाकले. पथकाने मोठ्या प्रमाणावर हे साहित्य जप्त केले असून, या कारवाईमुळे सावेडी परिसरातील रस्ते मोकळे श्वास घेताना दिसत आहेत.

शहराचे विद्रुपीकरण थांबवण्यासाठी ही कारवाई अत्यंत आवश्यक होती, अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. शहरात अनधिकृत जाहिराती लावणाऱ्यांवर आता दंडात्मक कारवाईदेखील करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेच्यावतीने करण्यात आली.

## आठवड्याच्या शेवटच्या दिवशी शेअर बाजारामध्ये मोठी घसरण

मुंबई – भारतीय शेअर बाजारात आठवड्याच्या शेवटच्या दिवशी १९ जून रोजी मोठी घसरण झाली. सेन्सेक्समध्ये ८३३ अंकांची घसरण होऊन निर्देशांक ७६५७६.८९ पर्यंत पोहोचला. निफ्टीमध्ये २२९ अंकांची घसरण होऊन २३९३८.७५ अंकांपर्यंत पोहोचला आहे.

शेअर बाजारात आयटी कंपन्यांच्या शेअरमध्ये मोठी घसरण झाली. निफ्टी आयटी निर्देशांकात ६ टक्क्यांची घसरण झाली. Accenture नं मागणी कमजोर राहण्याचा अंदाज जाहीर केला आहे. यामुळं आयटी कंपन्यांच्या स्टॉकमध्ये घसरण झाली. इन्फोसिसच्या शेअरमध्ये ७.६ टक्क्यांची घसरण, महिंद्राच्या स्टॉकमध्ये ६.३ टक्के, टीसीएसच्या शेअरमध्ये ६ टक्के घसरण झाली. तर, एचसीएल टेक ५.३ टक्के आणि विप्रोच्या शेअरमध्ये ३.६ टक्के घसरण झाली.

आयटी कंपन्यांच्या गुंतवणूकदारांना आज सर्वात मोठा फटका बसला आहे. बाजार सुरु होताच गुंतवणूकदारांचे जवळपास २ लाख कोटी रुपये बुडाले आहेत.

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा :
कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

डीटीपी ऑपरेटर पाहिजे
कोरल-ड्रॉ, पेजमेकर, फोटोशॉप, इनडिझाईनच्या कामाचा अनुभव असलेले कॉम्प्युटरसाठी डिटीपी ऑपरेटर पाहिजे
दैनिक नवा मराठा कार्यालय
कै. आचार्य गुंदेचा चौक, गंज बाजार, अ.नगर
Mo. 9823115157

CCTV CAMERA बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल
ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

# गृहिणी

## आरोग्य

### अननस ठरेल 'सुपरफूड'

अननस हे काटेरी मुकुट परिधान केलेले पण आतून अमृतासारखे रसाळ फळ आहे. प्राचीन काळापासून याला 'फळांचा राजा' मानले जाते आणि आता आधुनिक आहारशास्त्रानेही याला 'सुपरफूड'चा दर्जा दिला आहे. अननस व्हिटॅमिन सी, मँगनीज, फायबर आणि शक्तिशाली अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध आहे. यातील खास 'ब्रोमेलेन' नावाचे एन्झाईम पचनक्रिया सुधारते, शरीरातील सूज कमी करते आणि जखमा भरून येण्यास मदत करते. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी अननस रामबाण आहे कारण एका वाटी अननसातून दिवसभराची व्हिटॅमिन सी ची गरज जवळपास पूर्ण होते. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी हे फळ उत्तम आहे, कारण यात कॅलरीज कमी आणि पाण्याचे प्रमाण जास्त असते. मँगनीजमुळे हाडे मजबूत होतात तर अँटिऑक्सिडंट्स हृदयविकार व कॅन्सरसारख्या आजारांपासून बचाव करतात. उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी, त्वचा तजेलदार करण्यासाठी आणि केसांच्या आरोग्यासाठीही अननसाचा उपयोग होतो. आयुर्वेदात अननसाला पित्तशामक व भूक वाढवणारे फळ मानले आहे. आंबट-गोड चवीमुळे ते ज्यूस, सॅलड, चटणी अशा अनेक प्रकारे खाल्ले जाते. महागड्या विदेशी सुपरफूड्सपेक्षा अननस सहज, स्वस्त आणि आपल्या मातीतले असल्याने अधिक गुणकारी ठरते.

## पाककला

### मशरुम मसाला

**साहित्य :** २०० ग्रॅम मशरूम, २ कांदे बारीक चिरून, २ टोमॅटो प्युरी, १ सिमला मिरची, १ चमचा आलं-लसूण पेस्ट, २ हिरव्या मिरच्या, १ चमचा लाल तिखट, अर्धा चमचा हळद, १ चमचा धने-जिरे पावडर, १ चमचा गरम मसाला, मीठ, कोथिंबीर, २ चमचे तेल, तमालपत्र-लवंग-दालचिनी फोडणीसाठी

**कृती :** कढईत तेल गरम करून तमालपत्र, लवंग, दालचिनी टाका. कांदा गुलाबी होईपर्यंत परता. आलं-लसूण पेस्ट आणि हिरवी मिरची टाकून परता. टोमॅटो प्युरी टाकून तेल सुटेपर्यंत शिजवा. हळद, तिखट, धने-जिरे पावडर, मीठ टाकून मसाला परतून घ्या. सिमला मिरची आणि धुऊन पुसलेले मशरूम टाकून मोठ्या गॅसवर २ मिनिट परतावे. झाकण ठेवून ५ मिनिट वाफेवर शिजू द्या. मशरूमचे पाणी सुटते म्हणून वेगळे पाणी नको. शेवटी गरम मसाला व कोथिंबीर टाक.

## वास्तू

### पाण्याची टाकी

* जमिनीखालील टाकी ईशान्य कोपऱ्यात असावी. यामुळे घरात समृद्धी येते.
* छतावरील टाकी नैऋत्य कोपऱ्यात उंचावर ठेवा. ईशान्येला वरची टाकी ठेवल्यास आर्थिक नुकसान होते.
* आग्नेय कोपऱ्यात पाण्याची टाकी अजिबात नको.

## सौंदर्य

* झोपण्यापूर्वी मेकअप रिमूव्हरने लिपस्टिक काढूनच झोपा. केमिकल्समुळे ओठ निस्तेज होतात.

## सल्ला

कोथिंबीर-पुदिनाची मुळे कापून टाका, टिश्यूमध्ये गुंडाळून झिप लॉक बॅगेत फ्रीजला ठेवा. १०-१२ दिवस हिरवीगार राहते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. २० जून २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ शुक्लपक्ष, मघा ०९।२६, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

## राशिभविष्य

**मेष :** कुटुंबात सौख्य, मुलांकडून चांगली बातमी मिळेल. कामात आपला ठसा उमटेल.

**वृषभ :** व्यवसायात चांगली कमाई, परदेशातून आनंदाची बातमी. राजकीय क्षेत्रात सहभाग वाढेल, उत्साह वाढेल.

**मिथुन :** महत्त्वाची वार्ता समजेल, प्रवास सुखकर होतील. बौद्धिक कामात सावध राहावे लागेल.

**कर्क :** मौज-मजा व पर्यटनाची संधी मिळेल. दैनंदिन कामे रखडतील, श्रम वाढतील.

**सिंह :** वैवाहिक जीवनात सुसंवाद साधाल, प्रभाव राहील. मन थोडे उदास राहील, संशय वाढेल.

**कन्या :** नोकरीत समाधानकारक स्थिती, हितशत्रूंवर मात. चिंता व पोटाचे त्रास संभवतात.

**तूळ :** कार्यक्षेत्रात सुसंधी व प्रसिद्धी लाभेल. मन संवेदनशील राहील, विचारांचे ओझे जाणवेल.

**वृश्चिक :** कार्यात यश व आर्थिक लाभ, नवीन कामाचा आरंभ. प्रॉपर्टीचे नवीन प्रस्ताव समोर येतील.


**धनु :** मन द्विधा अवस्थेत राहील, निर्णय रखडतील. कौटुंबिक वातावरण क्लेशदायी राहील.

**मकर :** दिवसाची सुरुवात मंगल, शुभ प्रसंग घडेल. चंद्र मकर राशीत, आत्मबल वाढेल.

**कुंभ :** चंद्र कुंभ राशीत प्रवेश करेल, बदल जाणवतील. खर्च वाढेल, आर्थिक व्यवहार जपून करा.

**मीन :** सामाजिक कार्यात भाग घेण्याची संधी मिळेल. धनलाभाचे योग, मान-सन्मान वाढेल.

## शब्दगंध क्र. ७४५५ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) गोंधळाची अवस्था; अराजक ६) पैसा; अडका ७) चार वार्णीपैकी एक ८) बंदुकीची दारू; मोठा आवाज; स्फोट ९) गुंडगिरी वगैरे करून जीवन जगणारा; आवारा ११) सोन्याचांदीच्या दागिन्यांचा व्यवहार करणारा; हुंडी वगैरचा व्यवहार करणारा १२) एक महिला मराठी संत १५) दुष्ट; चूर्ण करण्याचे पात्र १६) सारखा; समान; बरोबर १७) फासळी १९) श्रीमंत; धनवान २२) पाण्यातून जाणारे वाहन; जहाज; होडी २३) एक लोककला; निर्लज्ज वर्तन २४) ढ; मंद बुद्धीचा

**उभे शब्द :-** १) कडक कवच असलेले एक फळ २) अनेक वस्तू एकत्र करणे किंवा जमविणे ३) मंत्र किंवा देवाचे नाव यांचा पुन्हा पुन्हा उच्चार ४) पूर्ण; निष्णात; पक्का; शहरातील पेठ ५) आवरण; साल; कवच ८) बारा स्वरांच्या मिलाफाने व्यंजनापासून तयार होणारी अक्षरांची मालिका १०) स्त्रीचे एक नाव; तन्मय; तल्लीन १३) मोगल राजवटीचा संस्थापक १४) शक्ती; जोर; चुरस; ईर्ष्या १६) निष्णात; चटावलेला (गुन्हेगार वगैरे) १८) धष्टपुष्ट २०) मनातील विचार; मानसिकता २१) बाजू; दिक्; डायरेक्शन २२) बस्तान

### शब्दगंध क्र. ७४५४ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ता | न | पु | रा | ■ | क | प | डा |
| व | ■ | रा | ज | का | र | ण | ■ |
| दा | न | त | ■ | वा | ■ | वा | ट |
| न | म | न | ■ | ■ | वा | न | र |
| ■ | क | ■ | स | हा | ■ | क | फ |
| मो | ह | र | म | ■ | प | ■ | ल |
| ह | रा | ■ | जू | ■ | सं | प | ■ |
| र | म | ■ | त | र | त | री | त |

### फिल्मीचक्कर क्र. १२४१ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | म | ज | द | खा | न | ■ | पा |
| क | ■ | ल | ■ | ती | ■ | जा | नी |
| ब | न | ■ | औ | र | ■ | ते | रे |
| र | म | व्या | ■ | ■ | ■ | ■ | पा |
| ■ | क | ■ | ब | र | ख | रा | नी |
| जो | ह | र | ■ | जा | न | ■ | ■ |
| ■ | ला | ■ | आ | ■ | दा | मि | नी |
| स | ल | मा | न | खा | न | ■ | ल |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** झाड जेवढं फळांनी लगडतं, तेवढंच ते जमिनीकडे झुकतं.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## कॅलिस्थेनिक्स काय आहे? जिम चांगले कॅलिस्थेनिक्स?

आजच्या युगात फिटनेस म्हणजे जिम, महागडी मशीन आणि प्रोटीन डब्बे असा समज झाला आहे. पण हजारो वर्षांपासून माणूस एकाच गोष्टीवर अवलंबून होता ती म्हणजे स्वतःचे शरीर. जिम नव्हती तेव्हा मावळे, ग्रीक योद्धे, कुस्तीपटू कसे तयार व्हायचे? उत्तर एकच आहे कॅलिस्थेनिक्स. कॅलिस्थेनिक्स म्हणजे कोणत्याही बाह्य वजनाशिवाय फक्त शरीराच्या वजनावर केलेला व्यायाम. हा खेळ नाही, ही जगण्याची पद्धत आहे जी ताकद, तोल आणि शिस्त एकत्र शिकवते.

जगात दोन प्रकारची ताकद असते. एक दिसण्यासाठी आणि एक टिकण्यासाठी. बॉडी बिल्डिंग पहिल्या प्रकारात बसते तर कॅलिस्थेनिक्स दुसऱ्या प्रकारात. इथे डंबेल उचलायचे नसतात तर स्वतःला उचलायचे असते. हाच सगळ्यात मोठा फरक आहे. पुश-अप मारताना जमीन तुम्हाला खाली खेचते आणि तुम्ही तिला हरवता. पुल-अप करताना गुरुत्वाकर्षण तुम्हाला शून्य लेखते आणि तुम्ही त्याला उत्तर देता. म्हणूनच कॅलिस्थेनिक्स करणारा माणूस फक्त मजबूत नसतो तर जिद्दीही असतो. या व्यायामाची सुरुवात शाळेतल्या पीटीच्या तासापासून होते. शिक्षक सांगायचे, बैठका काढा, जोर काढा. तेच खरे कॅलिस्थेनिक्स होते. पुढे आपण त्याला विसरतो आणि जिमच्या चकचकीत मशीनकडे धावतो.

पण सत्य हे आहे की बारवर लटकून एक पुल-अप मारणे हे १०० किलो लॅट पुलडाउनपेक्षा कठीण आहे. कारण मशीन तुम्हाला आधार देते, बार देत नाही. बार फक्त परीक्षा घेतो. कॅलिस्थेनिक्सचे सौंदर्य त्याच्या साधेपणात आहे.

सकाळी उठा, मोकळ्या हवेवर जा. जमिनीवर पुश-अप मारा, झाडाच्या फांदीला लटकून पुल-अप करा. पैसा नाही, गाडी नाही, ट्रेनर नाही तरी तुमची बॉडी घडत राहते. हळूहळू तुमच्या लक्षात येते की तुमचे खांदे रुंद झालेत, पोट आत गेलंय. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तुमचा आत्मविश्वास वाढलाय कारण आता तुम्ही स्वतःवर अवलंबून आहात. पुढची पायरी म्हणजे स्किल. इथेच कॅलिस्थेनिक्स जिमला मागे टाकते. जिममध्ये आज १० किलो वाढवले उद्या १२ किलो. आकडे बदलतात, आयुष्य तेच. पण इथे आज नी-सिट पुल-अप, उद्या एल-सिट, परवा मसल-अप. रोज नवीन युद्ध आहे. जेव्हा पहिल्यांदा हँडस्टँड ५ सेकंद टिकतो तेव्हा लहान मुलासारखा आनंद होतो. जेव्हा फ्रंट लीव्हरमध्ये शरीर हवेत तरंगते तेव्हा गुरुत्वाकर्षणाला हरवल्याचा फील येतो. ह्युमन फ्लॅग करणारा माणूस बघून लोक मोबाईल काढतात कारण ती कला आहे.

अनेकांना वाटते की याने फक्त सडपातळ बॉडी होते. हे अर्धसत्य आहे. ज्याने वेटेड पुल-अप, वेटेड डिप्स सुरू केले त्याची पाठ आणि छाती कोणत्याही बॉडीबिल्डरपेक्षा कमी नसते. फरक एवढाच की इथे स्नायू कामासाठी बनतात, शो-ऑफसाठी नाही. पोलीस भरती, आर्मी, स्पोर्ट्स यात कॅलिस्थेनिक्स बेसिक आहे कारण मैदानावर डंबेल नसतो. तिथे लागतो तोल, चपळता आणि दम. हे तिन्ही कॅलिस्थेनिक्स देते. हा प्रवास सोपा नाही. सुरुवातीला एक पुल-अपसठी महिना लागू शकतो. खांदे दुखतील, मन म्हणेल जाऊ दे जिम लावू. पण जो टिकला तो जिंकला. कारण एकदा बारशी मैत्री झाली की आयुष्यभराची ताकद मिळते. वयाच्या पन्नाशीमध्येसुद्धा कॅलिस्थेनिक्स करणारे लोक तरुणांना लाजवतात. शेवटी कॅलिस्थेनिक्स म्हणजे स्वातंत्र्य आहे. जिमच्या वेळेचे बंधन नाही, ट्रेनरची वाट नाही. पाऊस आला तरी खोलीत करता येते. गावी गेला तरी शेतात करता येते. हे शरीराला मंदिर मानून त्याचीच पूजा करण्यासारखे आहे. म्हणूनच म्हणतात, वजन उचलून बॉडी बनते पण स्वतःला उचलून माणूस बनतो.

## खरी ताकद

एका गावात समीर आणि अजय नावाचे दोन मित्र राहत होते. दोघांनाही ताकदवान बनायचे होते पण त्यांनी वेगळे रस्ते निवडले. समीर शहरात गेला आणि त्याने चकचकीत एसीवाले जिम लावले. तिथे मोठ्या मशीन, आरसे आणि ट्रेंड डंबेल होते. अजय मात्र गावातच थांबला. त्याने वडाच्या झाडाला एक लोखंडी बार बांधला आणि अंगणालाच आपले जिम बनवले. समीर रोज वजन वाढवायचा, आरशात बघून स्वतःवर खुश व्हायचा कारण त्याचे स्नायू दिवसेंदिवस फुगत होते. अजयकडे मात्र काहीच नव्हते. तो रोज जमिनीवर पुश-अप मारायचा, बारला लटकून पुल-अपचा प्रयत्न करायचा.

सुरुवातीला त्याला एकही पुल-अप जमत नव्हता तरी त्याने जिद्द सोडली नाही. सहा महिन्यांत समीरची बॉडी मोठी झाली, शर्ट टाइट व्हायला लागले. अजयचे शरीर सडपातळ राहिले पण त्याचे खांदे रुंद झाले आणि हातात वेगळीच ताकद आली. मग एक दिवस गावात मोठा पूर आला. समीरचे महागडे जिम पाण्याखाली गेले. लाईट गेली, मशीन बंद पडल्या आणि त्याचा व्यायाम पूर्ण थांबला. अजयचे अंगणही पाण्याने भरले पण त्याने घराच्या छतावर जाऊन व्यायाम सुरूच ठेवला. तिथल्या गजाला धरून त्याने पुल-अप मारले, छतावर पुश-अप केले. त्याच वेळी गावातले आजोबा एका झाडावर अडकले होते. समीर हताशपणे म्हणाला की मी १०० किलो बेंच मारतो पण झाडावर चढता येत नाही. अजय मात्र क्षणाचाही विचार न करता धावला. त्याने भिंतीवरून उडी मारली, फांदी पकडून मसल-अप केला आणि आजोबांना सुखरूप खाली आणले. सगळे गावकरी टाळ्या वाजवू लागले.

समीरची मान शरमेने खाली गेली. पूर ओसरल्यावर तो अजयकडे गेला आणि म्हणाला की तुझी ताकद खरी आहे मित्रा. अजय फक्त हसला आणि म्हणाला जिम वाईट नाही, पण शरीर फक्त आरशासाठी कमावू नकोस. कारण संकटाच्या दिवशी डंबेल कामाला येत नाही, तेव्हा कामाला येते ती स्वतःला उचलण्याची ताकद. हे ऐकून समीरने ठरवले की आता तो आठवड्यातून तीन दिवस जिम करेल आणि तीन दिवस अजयसोबत बारवर घाम गाळेल. कारण त्याला कळले होते की दिसण्यासाठी बनवलेली बॉडी एक वेळ फसते, पण टिकण्यासाठी कमावलेली ताकद आयुष्यभर साथ देते.

फक्त आरशात मोठे दिसणारे स्नायू महत्वाचे नाहीत. खरी ताकद तीच जी संकटाच्या वेळी स्वतः ला आणि दुसऱ्याला वाचवू शकते.

# आत्मशक्ति



शोधावे असे कुणालाही सुचणार नाही. परमेश्वराने त्याचा सल्ला स्विकारला. तो माणसाच्या हृदयांत लपला आणि अजूनही तेथेच लपून आहे.

आपल्या जीवनाचे लक्ष्य समजावून सांगण्यासाठी आंतरिक विद्या मदत कशी करते ?

### दैनंदिन समस्या

काही लोकांच्या दृष्टीकोनातून रचनेबाबतचे प्रश्न किंवा जीवनमरणाचे प्रश्न आमच्या दैनंदिन जीवनाच्या पलिकडचे आहेत! माणसे आपल्या रोजच्या समस्यातच अडकून राहतात. जसे, मी कोणती नोकरी करावी? मी कुणाबरोबर लग्न करावे ? मी आपल्या मुलांना कोणत्या विश्वविद्यालयांत पाठवावे? येथे जीवनमरणाच्या प्रश्नाला काहीही महत्त्व नाही. प्रश्न असा उभा रहातो की, जागृत आत्म्याचे अमर्यादित ज्ञान आमच्या दैनंदिन समस्यांची उकल करण्यासाठी व त्याबरोबरच आमच्या जीवनाचे लक्ष्य साध्य करण्यासाठी उपयोगी पडेल काय ?

सर्वात अगोदर आपण अमर्यादित ज्ञानाची व्याख्या करू या. आपण व्याख्यान किंवा पुस्तक वाचनाद्वारे बौध्दिक ज्ञान प्राप्त करतो. त्यास अमर्यादीत ज्ञान म्हणता येणार नाही. अमर्यादीत ज्ञान हे चैतन्य आहे. प्रभुला आम्ही चैतन्य म्हणतो, आमचा आत्मा परमात्म्याचे रुप असल्याने तोही चैतन्य आहे. चैतन्यावस्था म्हणजे सर्व काही जाणले जाते अशी अवस्था! जेव्हा असे हे पवित्र ज्ञान मिळवतो तेव्ह आम्ही चैतन्यतेच्या अवस्थेला पोहोचतो व ह्या अवस्थेत आम्ही आमच्या जीवनाचे लक्ष्य प्राप्त करून घेतो व जीवनरहस्याचे उत्तर मिळिवतो.

आत्म्याचे महान लक्ष्य आणि त्याची प्राप्ती ही केवळ तत्त्वज्ञानी व विचारवंतांसाठीच नाही तर प्रत्येक माणसासाठी आहे. मग हा सर्वसाधारण माणूस आपल्या कुटुंबियांसाठी साधनसामुग्री गोळा करण्यात मग्न असो वा ह्या संघर्षांनी भरलेल्या जगात सदाचारपूर्वक वागण्याचा प्रयत्न करणारा असो अथवा ह्या अव्यवस्थित जगात विशिष्ट हेतू मनांत धरून वागण्याचा प्रयत्न करणारा असो. ह्या सर्वांसाठी आत्मानुभवाचे महत्त्व आहे. आम्हाला वाटते त्यापेक्षाही आत्मा अधिक जवळ आहे. व आमचे दैनंदिन जीवन तो पूर्णत: जाणून आहे.

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

कोणते नकारात्मक संस्कार असतात. त्यामुळे तडजोड करता न येण्याच्या त्यांच्या असमर्थतेबाबत तुम्ही दया दाखवली पाहिजे.

सुरेश ओबेरॉय : मी जरी त्या कार्यक्रमाला गेलो तरी ते फक्त माझ्या बायकोसाठी जाईन, त्यांच्यासाठी नाही. शिवानीदीदी : असं केलं तर कर्म करण्यामागचा तुमचा हेतू योग्य नसेल. दुसऱ्या कोणाच्या आनंदासाठी कधीच कुठलीही गोष्ट करू नका, तुमच्या आनंदासाठी करा. आजकाल आपण आपल्या आयुष्यातले खूप मोठे निर्णयही आपल्या कुटुंबाच्या आनंदासाठी घेतो. आपण अशा अनेक महिलांना भेटतो ज्या उच्च शिक्षित असूनही त्यांच्या

### संस्कार

कुटुंबाकरता नोकरी सोडतात किंवा त्या करिअर करत नसतात. अशा निर्णयांमागे, आपल्या घरात शांतता नांदावी असा त्यांचा सद्हेतू असतो. पण तेव्हा, मी हे पाऊल माझ्या कुटुंबाच्या आनंदासाठी उचलत आहे अशा विचारांनी त्यांनी त्यांच्या मनाला प्रोग्रॅम केलेलं असतं आणि मग त्यांना वाटतं की, इतकी वर्ष त्याग करूनही आपलं कुटुंब समाधानी नाही. सुरेश ओबेरॉय : कदाचित कुटुंबाला हे माहीतही नसेल.

शिवानीदीदी : त्यांनी कष्ट करूनही त्यांचं कुटुंब समाधानी नाहीये कारण त्यांनी असे विचार निर्माण केले मी त्यांच्यामुळे घरी थांबते आहे... मी खूप अभ्यास केला..... मी चांगलं करिअर करू शकले असते... आज माझ्या मित्र-मैत्रिणी कुठे पोहोचल्या... जर मलाही संधी मिळाली असती तर मी ही हे सगळं मिळवू शकले असते... आज माझी काय किंमत आहे? याचा अर्थ त्या आनंदी नाहीयेत आणि त्यांचं ऊर्जाक्षेत्रही नकारात्मक आहे. हेच तरंग त्या पुढे इतरांनाही पाठवतात. तेव्हा कोणासाठी म्हणून काहीतरी करणं चुकीचं आहे.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मित्र : अरे लग्न कसं चाललंय?

दुसरा : पेट्रोलसारखं...

मित्र : म्हणजे?

दुसरा : रोज महाग होतंय आणि आवाज पण वाढतोय.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगातील सर्वात उंच शिखर माउंट एव्हरेस्ट कोणत्या दोन देशांच्या सीमेवर आहे? – नेपाळ आणि चीन

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार :

पालक ही शीतल, मूत्रल, सारक, वायुकारक, पचण्यास जड, पित्तशामक, रेचक व वेदनाहारी आहे. या सर्व गुणधर्मांमुळे पालकाची भाजी आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे व सर्व आजारांमध्ये पथ्यकर अशी आहे.

आधुनिक शास्त्रानुसार : पालकामध्ये लोह, कॅल्शिअम, फॉस्फरस, तसेच ॲमिनो ॲसिड, प्रथिने, खनिजे, आर्द्रता, तंतुमय व पिष्टमय पदार्थ, अ, ब

### पालक

व क जीवनसत्त्वे, फॉलिक ॲसिड भरपूर प्रमाणात असते.

उपयोग : १) आरोग्य चांगले राखण्याच्या दृष्टीने शाकाहार करणाऱ्या व्यक्तींनी पालकाच्या भाजीचे नियमित सेवन करावे. कारण मटण, चिकन, अंडी, मासे यांच्या मांसातून जेवढ्या प्रमाणात प्रथिने मिळतात, अगदी तेवढ्याच प्रमाणात पालकाच्या भाजीतून मिळतात. म्हणून मांसाहार न घेणाऱ्यांसाठी पालकाचे सेवन हे वरदानच आहे. पालकाच्या भाजीत लोह व तांब्याचा (कॉपर) अंश असल्याने रक्ताल्पता (निमिया) या आजारावर ही भाजी अत्यंत उपयुक्त आहे. हिच्यामध्ये रक्तवर्धक गुणधर्म असल्याने क् निर्माण होण्याची प्रक्रिया लगेच सुरू होते. तसेच पालक रक्त शुद्ध करतो व हाडांना

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



स्वर्गीय प्रीती बोगावत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मोफत निसर्गोपचार व आरोग्य मार्गदर्शन शिबिर उत्साहात झाले.

# स्व. प्रीती बोगावत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मोफत निसर्गोपचार व आरोग्य मार्गदर्शन शिबिर उत्साहात

नगर – स्वर्गीय प्रीती प्रतीक बोगावत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या प्रथम मासिक पुण्यस्मरण दिनानिमित्त तसेच विवाहदिनाच्या औचित्याने आयोजित करण्यात आलेले मोफत निसर्गोपचार व आरोग्य मार्गदर्शन शिबिर उत्साहात व भावनिक वातावरणात झाले. सहकार महर्षी श्री सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्था, रनरागिणी महिला प्रतिष्ठान आणि वंदे मातरम् युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने पतसंस्थेच्या सभागृहात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वर्गीय प्रीती बोगावत यांना उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर आरोग्य वर्धिनी निसर्गोपचार केंद्राच्या डॉ. हेमा शेलोत आणि रनरागिणी महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा मिनल बोरा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी जैन ओसवाल पतसंस्थेचे माजी चेअरमन ईश्वर बोरा यांनी मनोगत व्यक्त करताना स्वर्गीय प्रीती बोगावत यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांनी सांगितले की, प्रीतीभाभी या केवळ एक व्यक्ती नव्हत्या, तर त्या धैर्य, जिद्द आणि सेवाभावाचे मूर्तिमंत उदाहरण होत्या. संकटांशी लढताना त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला आणि इतरांनाही प्रेरणा दिली. याच त्यांच्या लढाऊ वृत्तीमुळे त्यांना सर्वजण प्रेमाने रणरागिणी म्हणून ओळखत असत. वंदे मातरम् युवा प्रतिष्ठानच्या महिला आघाडीला रणरागिणी महिला प्रतिष्ठान हे नावही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून प्रेरणा घेऊन देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. आज आयोजित करण्यात आलेले हे आरोग्य शिबिर त्यांच्या स्मृतींना अभिवादन करणारे आणि समाजोपयोगी कार्याचा संदेश देणारे असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर प्रतीक बोगावत यांनी अत्यंत भावुक शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या. पत्नी प्रीती यांच्या कॅन्सरविरुद्धच्या लढ्याच्या काळात निसर्गोपचार, योग्य आहार–विहार आणि सकारात्मक जीवनशैलीमुळे त्यांना शारीरिक व मानसिक वेदनांपासून काही प्रमाणात दिलासा मिळाला होता, असे त्यांनी सांगितले. त्या काळात निसर्गोपचाराचे महत्त्व त्यांनी जवळून अनुभवले. प्रीतीची नेहमी इच्छा होती की, अशा नैसर्गिक उपचार पद्धतींची माहिती समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचावी, जेणेकरून लोकांना निरोगी आणि आनंदी जीवन जगता येईल. आज तिच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा हा आमचा छोटासा प्रयत्न आहे, असे सांगताना ते अनेकदा भावनाविवश झाले आणि उपस्थितांनाही क्षणभर गहिवरून आले.

शिबिरात प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेल्या डॉ. हेमा शेलोत यांनी एक तास उपस्थितांना निसर्गोपचार आणि आरोग्य संवर्धनाविषयी सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, मानवाचे शरीर स्वतःला निरोगी ठेवण्याची आणि रोगांवर मात करण्याची विलक्षण क्षमता बाळगते. योग्य दिनचर्या, संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, सकारात्मक विचार, वेळेवर पाणी पिण्याची सवय आणि निसर्गाशी असलेले नाते यामुळे अनेक आजारांपासून दूर राहता येते. औषधोपचार महत्त्वाचे असले तरी अनेक जीवनशैलीजन्य आजारांचे मूळ चुकीच्या सवयींमध्ये असल्याने त्यामध्ये बदल करणे अधिक आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी उपस्थितांना निसर्गोपचाराचे महत्त्व, जीवनशैलीतील आवश्यक बदल, संतुलित आहार, औषधांशिवाय निरोगी जीवनाचा मार्ग आणि दैनंदिन आरोग्य जपण्यासाठी आवश्यक सवयी याविषयी सविस्तर माहिती दिली.

शिबिरामध्ये नागरिकांसाठी नाडी परीक्षण (नाडी परीक्षा) सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली. यामुळे अनेकांना आपल्या आरोग्यस्थितीविषयी प्राथमिक माहिती मिळाली आणि भविष्यातील आरोग्यदायी जीवनशैलीबाबत मार्गदर्शनही प्राप्त झाले.

या प्रसंगी जैन ओसवाल पतसंस्थेचे चेअरमन अभय पितळे, व्हाईस चेअरमन शैलेश गांधी, संचालक संतोष गांधी, चेतन भंडारी, विनीत बोरा, शांतीलाल गुगळे, शरद गोयल, ॲड. आनंद फिरोदिया, व्यवस्थापक प्रशांत भंडारी, नयना बोगावात, प्रमोद डागा, वंदे मातरम् युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष आदित्य गांधी, उपाध्यक्ष संभव काठेड, ईश्वर बोरा, कुणाल भंडारी, चिंटू खंडेलवाल, भैय्या भांडेकर, ईश्वर कटारिया, प्रतीक बोगावत, शुभम मेहेर, रोहित बोथरा, प्रणय चोरडिया, विशाल वालकर, देवेंद्र दूधाले, तसेच रनरागिणी महिला प्रतिष्ठानच्या मिनल बोरा, सोनल गांधी, प्रियांका भूमकर, दीपिका मुथा, नेहा डहाळे, शामली कटारिया, मुग्धा काठेड, प्रणील बोगावत, अरुणा बोगावत, दिव्या बोगावत, तेजस्विनी बोगावत, दीपाली चोरडिया, स्वीटी भन्साळी, अर्चना बोथरा आदींसह नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी शैलेश गांधी यांनी उपस्थित आयोजक, कार्यकर्ते आणि नागरिकांचे आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## श्रमाला ज्ञानाची जोड

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

संकलन: दिशान फिचर्स





मुक्ती हवी ज्याला, जावे त्याने हिमालयाला। स्वीकारावे तपश्चर्येला. ती कशी हवी करायला? तर पाहावे तिथे एखाद्या साधूला. निरखावे त्याच्या प्रत्येक कृतीला. लागावे तसे आचरायला.

हिमालयतला साधू करतो, तसे पाहाना प्रत्येक प्राणी कसा आचरतो. मासा सारखा स्नान करीत असतो. सर्प वारा पीत बसतो. बकरा झाडांच्या पानावर चरतो. चातक पक्षी कधी अन्नाचा घास तरी घेतो ? छे तो फक्त मेघाचे पाणी पितो. उंदिर बिळात रात्रंदिवस राहतो. गाढव सारखा राखेतच लोळतो. बगळा एका पायावर उभे राहून ध्यान करतो. पण म्हणून यातला कुणीतरी मुक्ती मिळवतो? नाही ना! का हो? कारण त्यांना ज्ञान नाही. नुसत्या ढोरमेहनतीने का काम साधते ? संकटातून मुक्त होता येते? जो करायचा उद्योग त्याच्या संपूर्ण ज्ञानाचा आधी साधावा योग. धंद्यातले जाणून घ्यायचे बारकावे. कुठून काय मागावे आणि ते कसे काटकसरीने वापरावे? याचे ज्ञान नीट व्हावे, तेव्हा कुठे यश लाभावे. मग दुःख व दारिद्य या तापत्रयावून मुक्ती मिळवावी ।

केवळ स्नान, पान आणि ध्यान यालाच तपश्चर्या मानायचे का? छे । हे खोटे. हे वरपांगी. ही बाह्य लक्षणे.

मन लावून श्रम करा. विजयश्री वरा. नाहीतर हास्यास्पद ठराव । खऱ्याचे झाले खोटे, मग सगळच तोटे. ज्ञान नसले की, खऱ्याला खोटे चिकटते. खोटेच खरे म्हणून चमकते. मग नुकसान होते. पदरी अपयश येते. म्हणूनच श्रमाला ज्ञानाची जोड हवी.

रशियात क्रांती झाली. तेव्हा ही कहाणी घडली. आजच्या स्टॅलिनग्रॅड शहराला तेव्हा पेट्रोग्रॅड म्हणत. पीटर दि ग्रेट या बादशहाच्या नावाने ते शहर ओळखले जाई. त्याच्या राजवाड्यासमोर भररस्त्यात एक प्रचंड मोठी शिळा होती. सुरेख होती. पण वाहतुकीत अडथळा आणीत होती. राजेशाही संपली आणि लेनिनची कारकीर्द आली. लेनिनला ती शीळा रस्त्यातून दूर करायची होती. पण करणार कशी? केवढी प्रचंड ! हलवणे शक्यच नाही. लावले कित्येक मजूर पण ती शिळा हलेना तसूभर. श्रम वाया गेले ।

तेवढ्यात एक शेतकरी आला. तो या मजुरांची मजा पाहू लागला. हा शेतकरी मजा पाहतोय म्हणून सगळे त्यांच्यावर चिडले. का उगाच हसतोस ? त्या शेतकऱ्यावर ओरडले.

तो शेतकरी म्हणाला, 'नाही, उगाच नाही. श्रमाला ज्ञानाची जोड नाही म्हणून यश येत नाही. '

'म्हणजे काय ?'

शेतकरी म्हणाला, 'सोपं आहे. एवढी शिळा हलवणं अशक्यच आहे. तिनं होणारा अडथळा मात्र दूर करता येण शक्य आहे. ती उचलता येत नाही, पण गाडला तर येईल ना? तिला जागीच गाडून टाका. '

त्यांनी तसे केले. शिळेला जमिनीत पुरले. अडथळा दूर झाला । कमी श्रमात हवे ते पदरी पडले. आजही स्टॅलिनग्रॅडच्या त्या शिळेचा वरचा भाग रस्ता म्हणून वापरतात. **– किशोर गांधी**

# अहिल्यानगर पोलीस दल शहर उपविभागाच्यावतीने २० जूनला 'शाळा – महाविद्यालय संवाद मेळावा'

नगर – पोलीस दल शहर उपविभागाच्यावतीने सुरक्षित विद्यार्थी आणि सुरक्षित कॅम्पस उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उपविभागातील सर्व शाळा व महाविद्यालये यांच्या संवाद मेळाव्याचे आयोजन २० जून रोजी सायंकाळी ५ वाजता पोलीस मुख्यालय मैदान येथे करण्यात आले असल्याची माहिती शहर उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी दिली.

या मेळाव्याअंतर्गत विद्यालयीन व महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनींची सुरक्षा तसेच सुरक्षित शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व अपर पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे हे मार्गदर्शन करणार आहेत.

या संवाद मेळाव्यास शाळा व महाविद्यालयांच्या प्रतिनिधींनी तसेच विद्यार्थी व शिक्षकांनी उपस्थित राहावे असे आवाहन शहर विभागाचे पोलीस उप अधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी केले आहे.

# सारसनगरच्या श्री स्वामी समर्थ केंद्रात जलशुद्धीकरण यंत्राचे व अरुण जल पाणपोईचे लोकार्पण



नगर – सारसनगर मधील श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक आणि बालसंस्कार केंद्र मंदिरास अध्यायावत जलशुद्धीकरण यंत्र देण्यात आले. या जलशुद्धीकरण यंत्राचे व अरुण जल या पाणपोईचे लोकार्पण गुरुवारच्या मुहूर्तावर झाले. यावेळी नगरसेविका मीना चोपडा, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, मर्चंट बँकेचे माजी चेअरमन संजय चोपडा, अवधूत फुलसौंदर, स्वामी समर्थ आध्यात्मिक केंद्राच्या अध्यक्षा पुष्पा सुपेकर आदी उपस्थित होते. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते स्वामीची आरती करण्यात आली.

यावेळी मीना चोपडा म्हणाल्या, सद्गुरु श्री स्वामी समर्थ यांच्या कृपेमुळे व आशीर्वादाने काम करत आहोत. सारसनगर मधील श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक केंद्र शेकडो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या ठिकाणी दैनंदिन दर्शनासाठी तसेच उत्सवाच्या वेळेस मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात. या भाविकांच्या सोयीसाठी येथे अध्यायावत जलशुद्धीकरण देण्याचा मानस व्यक्त केला होता. त्याची पूर्तता करून येथे सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानते.

प्रकाश भागानगरे म्हणाले, सारसनगर मधील विकासाला चालना देण्याबरोबरच हिंदू धर्माचे आध्यात्म व संस्कृती टिकण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत आहोत. प्रास्ताविक स्वामी समर्थ अध्यात्मिक केंद्राचे कार्याध्यक्ष सागर बाबळे यांनी केले. यावेळी स्वामी समर्थ अध्यात्मिक केंद्राचे ट्रस्टी रेश्मा पोकळे, अशा कुटे, ज्ञानेश शिंदे, किशोर शिंदे, विकास सुराणा, प्रवीण शिंगवी, नयन चंगेडिया व प्रकाश कराळे उपस्थित होते.

# गुरु अर्जुन देवजींच्या शहिदी दिनानिमित्त तारकपूरमध्ये लंगर व सरबत वाटप

## जीएनडी ग्रुपचा मानवतेचा संदेश

नगर – शीख धर्माचे पाचवे गुरु तथा मानवतेचे उपासक गुरु अर्जुन देवजी यांच्या शहिदी दिनानिमित्त तारकपूर परिसरात गुरु नानक देवजी (जीएनडी) ग्रुपच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यानिमित्त नागरिकांसाठी लंगर (प्रसाद) तसेच थंडगार सरबताचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते प्रसाद वाटप करून करण्यात आला.



गुरु अर्जुन देवजींच्या शहिदी दिनानिमित्त तारकपूरमध्ये लंगर व सरबतचे आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते वाटप करण्यात आली.

शहिदी दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमात गुरु अर्जुन देवजी यांच्या कार्याचा आणि बलिदानाचा गौरवपूर्ण स्मरण करण्यात आले. शीख धर्मातील सेवा, समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. यावेळी जनक आहुजा, नगरसेविका हरप्रीतकौर गंभीर, जीतू गंभीर, अजिंक्य बोरकर, जय भोसले, गजेंद्र भांडवलकर, मनीष खुराणा, अमन खुराणा, संजय आहुजा, करन आहुजा, बल्लू सचदेव, बबलू खोसला, किशोर कंत्रोड, गौरव कंत्रोड, गुनीत कंत्रोड, सागर कुमार, मनोज मनोचा, रोहित बत्रा, मॉन्टी तलवार, गिरीश खन्ना, विनीत कंत्रोड, गोलू गंभीर, खुश कंडुजा उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना आमदार संग्राम जगताप यांनी गुरु अर्जुन देवजी यांच्या जीवनकार्याचा गौरव केला. ते म्हणाले की, गुरु अर्जुन देवजी हे मानवतेचे खरे सेवक आणि धर्माचे निष्ठावान रक्षक होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात समाजसेवा, अध्यात्म आणि लोककल्याणासाठी कार्य केले. अन्याय, अत्याचार आणि दडपशाहीसमोर कधीही न झुकता त्यांनी आपल्या धर्मनिष्ठेचे पालन केले. अमानुष छळ सहन करूनही त्यांनी धर्माचा त्याग केला नाही. शीख धर्मासाठी ते शहीद होवून इतिहासात अजरामर झाले. त्यांच्या हौतात्म्यामुळे शीख धर्माच्या इतिहासाला नवे वळण मिळाले आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा समाजाला मिळाली. आजही त्यांचे जीवन आणि बलिदान समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात जनक आहुजा यांनीही गुरु अर्जुन देवजी यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, गुरु अर्जुन देवजी यांनी अमृतसर येथील गुरु रामदास सरोवराचे काम पूर्णत्वास नेले. तसेच शीख धर्माचा पवित्र ग्रंथ असलेल्या गुरु ग्रंथ साहिब यांच्या संकलनाचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी पूर्ण केले. समाजात आध्यात्मिक जागृती आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले. त्यांच्या विचारांचा प्रभाव वाढत असल्याने तत्कालीन मुघल सत्तेला तो खटकला. परिणामी त्यांना अमानुष छळाला सामोरे जावे लागले. मात्र धर्म आणि सत्याच्या मार्गावरून न ढळता त्यांनी शहिदी स्वीकारली. त्यांच्या त्यागामुळे धर्मनिष्ठा, सहनशीलता आणि मानवतेचा आदर्श समाजासमोर उभा राहिला, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या माध्यमातून गुरु अर्जुन देवजी यांच्या कार्याचे स्मरण करत त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

# जायंट्स वेल्फेअर फाऊंडेशन आयोजित आंतरराष्ट्रीय बैठकीत स्पेशल कमिटी मेंबर संजय गुगळे यांचे विविध विषयांवर मनोगत

## अहिल्यानगर ग्रुपतर्फे व्यवस्थापक वीरेंद्र अय्यर यांचा विशेष सन्मान





जायंट्स वेल्फेअर फाऊंडेशनच्या विशेष बैठकीत जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगरतर्फे व्यवस्थापक वीरेंद्र अय्यर यांचा विशेष सन्मान करताना स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे, जागतिक उपाध्यक्ष प्रफुल्ल जोशी आदी.

मुंबई – आंतरराष्ट्रीय सामाजिक संस्था जायंट च्या सेवा उपक्रमांना नवी दिशा देण्यासाठी केंद्रीय समिती सदस्य, विशेष समिती सदस्य व विशेष अधिकाऱ्यांची विशेष बैठक जायंट्स मुख्यालयात उत्साहात झाली. जागतिक अध्यक्षा सौ. शायना एन.सी. यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उप–जागतिक अध्यक्ष शिरीष कापडिया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सदस्य वाढ, प्रकल्प नियोजन, अहवाल प्रणाली, वेबसाइट विकास, सोशल मीडिया, न्यूजलेटर तसेच डिसेंबरमध्ये बेंगळुरू येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

संस्थेचे कार्य अधिक बळकट करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना अतिरिक्त जबाबदाऱ्या देण्यात आल्या. जागतिक उपाध्यक्ष प्रफुल जोशी, सीए. एम. लक्ष्मणन, एस.पी. चतुर्वेदी यांसह मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

बैठकीत स्पेशल कमिटी मेंबर संजय गुगळे यांनी विविध विषयांवर मनोगत व्यक्त केले. सदस्य वाढ आणि सेवा कार्य अधिक प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी त्यांनी मोलाच्या सूचना मांडल्या.

याप्रसंगी जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगरतर्फे जायंट वेलफेअर फौंडेशनचे व्यवस्थापक वीरेंद्र अय्यर यांचा विशेष सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. बैठकीनंतर सर्व सेंट्रल कमिटी सदस्य, स्पेशल कमिटी सदस्य आणि विशेष अधिकाऱ्यांनी आपले कार्य अहवाल सादर केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.



ग्रामीण विकास मंडळ संचलित चक्रधर स्वामी प्राथमिक विद्यालयच्या शिक्षिका क्रांती सानप पालवे यांची मराठी राजभाषा संवर्धन कृती समितीच्या जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

# मराठी राजभाषा जिल्हाध्यक्षपदी क्रांती सानप-पालवे यांची निवड

नगर – ग्रामीण विकास मंडळ संचलित चक्रधर स्वामी प्राथमिक विद्यालयच्या शिक्षिका क्रांती सानप पालवे यांची मराठी राजभाषा संवर्धन कृती समितीच्या जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

मराठी भाषेचा प्रचार–प्रसार, जतन, संवर्धन आणि दैनंदिन व्यवहारात तिचा अधिकाधिक वापर वाढवा या उदात्त उद्देशाने ही कार्यकारणी गठीत करण्यात आली आहे. क्रांती सानप पालवे उत्तम कवियत्री व लेखिका असून आकाशवाणी तसेच विविध वृत्तपत्रांमध्ये त्यांच्या कविता व लेख प्रसिद्ध झालेल्या आहेत. हिंदी पंडित परीक्षेत सुद्धा त्यांनी राज्यात प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळविला असून त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांनी नुकत्याच झालेल्या मराठी राजभाषा परीक्षेत उत्तम कामगिरी केली आहे. अनेक उत्तम कवितांसाठी त्यांना लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट कोल्हापूर संचलित राज्यस्तरीय काव्य लेखन स्पर्धेत त प्रथम क्रमांक व पुरस्कार मिळालेला आहे.

त्यांच्या याच कामाची दखल घेऊन मराठी राजभाषा संवर्धन कृती समिती राज्य संघटनेच्या प्रमुख सुलोचना क्षीरसागर व अमोल क्षीरसागर व राज्य कार्यकारणी यांनी क्रांती सानप यांची जिल्हाध्यक्षपदी सर्वानुमते निवड केली.

# दक्षिण आफ्रिकेतील कॉम्रेड मॅरेथॉन पूर्ण करुन शहरात परतलेल्या धावपटूंचे जल्लोषात स्वागत

## डॉ. अमित बडवे यांना प्लॅटिनम पदक; चार धावपटूंनी नगरच्या शिरपेचात रोवला मानाचा तुरा



दक्षिण आफ्रिकेतील कॉम्रेड मॅरेथॉन पूर्ण करुन शहरात परतलेल्या धावपटूंचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

नगर – दक्षिण आफ्रिकेत नुकत्याच पार पडलेल्या जगप्रसिद्ध आणि अत्यंत खडतर मानल्या जाणाऱ्या कॉम्रेड मॅरेथॉन २०२६ स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवून परतलेल्या अहिल्यानगरच्या चार धावपटूंचे शहरात उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. जागतिक स्तरावरील या स्पर्धेत दमदार कामगिरी करत शहराचे नाव आंतरराष्ट्रीय क्रीडा विश्वात उज्ज्वल करणाऱ्या धावपटूंवर नगरकरांनी अभिनंदनाचा वर्षाव केला.

दक्षिण आफ्रिकेतील डरबन ते पीटरमारित्झबर्ग या दोन शहरांदरम्यान पार पडलेल्या ८५.७७ किलोमीटरच्या कॉम्रेड अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये अहिल्यानगरचे डॉ. अमित बडवे, जस्मित वधवा, सुनील बनकर आणि सचिन राणे यांनी यशस्वीरित्या स्पर्धा पूर्ण करून उल्लेखनीय कामगिरी नोंदविली. या धावपटूंना मार्गदर्शन करणारे प्रशिक्षक संदीप जोशी यांचाही या यशात मोठा वाटा राहिला.

शहरात आगमन होताच धावपटूंचे ढोल–ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीत आणि घोषणांच्या गजरात स्वागत करण्यात आले. नगर–पुणे महामार्गावरील अहमदनगर महाविद्यालयाजवळील श्रीदीप हॉस्पिटल येथे आयोजित स्वागत सोहळ्यात क्रीडाप्रेमी, धावपटू, सामाजिक कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि कुटुंबीय उपस्थित होते. पारंपरिक पद्धतीने औक्षण करून धावपटूंवर पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी धावपटूंनीही ढोलाच्या तालावर ठेका धरत आनंद व्यक्त केला.

स्वागत सोहळ्यापूर्वी सर्व धावपटूंनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून आपल्या यशाचे श्रेय मातृभूमीला आणि शहरवासीयांच्या शुभेच्छांना अर्पण केले. अनेकांनी त्यांच्या गळ्यात पुष्पहार घालून सत्कार केला. आपल्या कुटुंबीयांशी गळाभेट घेताना अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले होते. हा क्षण उपस्थितांसाठी भावनिक आणि प्रेरणादायी ठरला.

कॉम्रेड मॅरेथॉन ही जगातील सर्वात जुनी आणि कठीण अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धांपैकी एक मानली जाते. पहिल्या महायुद्धात शहीद झालेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ सुरू करण्यात आलेल्या या स्पर्धे चे यंदाचे ९९ वे वर्ष होते. प्रत्येक वर्षी हजारो धावपटू या स्पर्धेत सहभागी होतात. यंदा जगभरातील सुमारे २२ हजार धावपटूंनी सहभाग घेतला होता. भारतातून २५० हून अधिक धावपटूंनी स्पर्धेत भाग घेतला असून, त्यामध्ये अहिल्यानगरच्या चार धावपटूंनी केलेली कामगिरी विशेष कौतुकास्पद ठरली.

या स्पर्धेत डॉ. अमित बडवे यांनी अवघ्या ९ तास ५८ मिनिटांत अंतर पूर्ण करत मानाचे प्लॅटिनम पदक पटकाविले. त्यांची कामगिरी नगरसाठी अभिमानास्पद ठरली. तसेच जस्मित वधवा यांनी १० तास ७ मिनिटांत, सुनील बनकर यांनी ११ तास १० मिनिटांत, तर सचिन राणे यांनी ११ तास ५३ मिनिटांत ही खडतर स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण केली.

# ‘आनंदऋषीजी इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल, फायर अँड इंडस्ट्रियल सेफ्टी’चा उन्हाळी परीक्षेमध्ये १०० टक्के निकाल



श्वेता कदम | प्रकाश तुपे | अनिकेत डोंगरे | धनंजय महतो | अभिषेक कुमार | दत्तात्रय गोरे | हरीश देशमुख | अक्षय चंगेडिया | पंकज सोनवणे

नगर – महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या अंतर्गत घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षा २०२६ मध्ये आनंद ग्लोबल फाउंडेशन संचालित आनंदऋषीजी इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल, फायर अँड इंडस्ट्रियल सेफ्टी, अहिल्यानगर या संस्थेने पुन्हा एकदा उत्कृष्ट कामगिरी करत १००% निकालाची परंपरा कायम राखली आहे.

ADMLT (Advanced Diploma in Medical Laboratory Technology)

कदम श्वेता यांनी ८६.१७% गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. तुपे प्रकाश यांनी ८६.००% गुणांसह द्वितीय क्रमांक, तर डोंगरे अनिकेत यांनी ८५.६७% गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

ADIS (Advanced Diploma in Industrial Safety)

धनंजय महतो यांनी ८९.०९% गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. अभिषेक कुमार यांनी ८४.७३% गुणांसह द्वितीय क्रमांक, तर दत्तात्रय गोरे यांनी ८३.५५% गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला.

Diploma in Fire Service Engineering

हरीश देशमुख यांनी ८५.६०% गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. अक्षय चंगेडिया यांनी ८१.४०% गुणांसह द्वितीय क्रमांक, तर पंकज सोनवणे यांनी ७९.००% गुणांसह तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संचालक प्रा. हिरालाल लुनावत, अमृता जैन व मनोज लुनावत यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच प्रा. सुंबे सर, प्रा. सुरुकुटला सर, मनीषा बोरा, जयेश बोथरा, मयुरी तिवारी व हर्षदा तिवारी यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संस्थेने पॅरामेडिकल, इंडस्ट्रियल सेफ्टी आणि फायर इंजिनिअरिंग क्षेत्रात सातत्याने उत्कृष्ट निकालाची परंपरा जपली असून विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून दिले आहे.

दरम्यान, शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी PGDMLT, ADIS आणि Diploma in Fire Service Engineering या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली असून इच्छुक विद्यार्थ्यांनी खालील क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. प्रवेशासाठी संपर्क ७२७६८१३१९९, ९१४५१५५७५५, ९११२७५५९५५ / ९२७०२६३१९९

# दि अंबिका महिला सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी सौ. शांता मोरे तर उपाध्यक्षा सौ.सुमन गोसावी



मेधा काळे | सा. शांता मोरे | सौ. सुमन गोसावी

नगर – दि अंबिका महिला सहकारी बँकेची सभा गणेश औटी, अध्यासी अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. सदर सभेत बँकेच्या अध्यक्षपदी सौ. शांता भिमराज मोरे तर उपाध्यक्षपदी संचालिका सौ. सुमन गणेश गोसावी यांची अविरोध निवड झाली. अध्यक्षपदाची सूचना प्रा.डॉ.सौ. संध्या अशोक जाधव यांनी केली तर अनुमोदन संस्थापिका प्रा.मेधा यशवंत काळे यांनी दिले. उपाध्यक्षपदाची सूचना सौ. शोभा पंडितराव खरपुडे यांनी केली तर अनुमोदन ॲड.सौ.विजया सुभाषराव काकडे यांनी दिले.

अध्यासी अधिकारी गणेश औटी यांनी खेळीमेळीच्या वातावरणात पदाधिकारी निवड झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. मावळत्या अध्यक्षा सौ. सरोजिनी सुरेशराव चव्हाण सर्वांनी सहकार्य केल्याबददल आभार मानले.

नुतन अध्यक्षा सौ. शांता भिमराज मोरे व उपाध्यक्षा सौ. सुमन गणेश गोसावी यांनी बँकेचा सध्याचा असलेला संमिश्र व्यवसाय रू. २२४ कोटी वरून रू. ३०० कोटी पर्यंत वाढविण्याचा आम्ही नक्कीच प्रयत्न करू. यामध्ये ग्राहक सेवा उचविण्याचा आमचा मानस असेल अशी उपस्थित सभेस ग्वाही देवून निवडी बद्दल सर्वांचे आभार मानले.

या प्रसंगी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचे अधिकारी श्री.पालवे, बँकेच्या संचालिका ॲड. सौ. शारदा लगड, सौ. भारती आठरे, सौ. शोभना चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश गायकवाड हे उपस्थित होते.

# रयतच्या उत्तर विभागीय समन्वय समितीवर शिक्षक नेते आबासाहेब कोकाटे यांची निवड



नगर – रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय समन्वय समिती सदस्यपदी चिचोंडी पाटील येथील ज्येष्ठ शिक्षक नेते आबासाहेब कोकाटे सर यांची निवड करण्यात आली आहे. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या बैठकीतील ठराव क्रमांक ८ अन्वये ही निवड जाहीर करण्यात आली असून, त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संस्थात्मक कार्याची दखल घेत त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

आबासाहेब कोकाटे यांनी यापूर्वी उत्तर विभागीय सल्लागार समिती सदस्य म्हणून कार्य केले असून, अनेक वर्षे न्यू इंग्लिश स्कूल, चिचोंडी पाटील विद्यालयात स्कूल कमिटी सदस्य तसेच अध्यक्ष म्हणूनही यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे विद्यालयाच्या भौतिक आणि गुणात्मक वाढीस मोठी चालना मिळाली आहे.

विद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. स्कूल कमिटी सदस्य, सल्लागार समिती सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक, माजी विद्यार्थी आणि हितचिंतक यांच्या बहुमोल सहकार्याने नुकतीच सुमारे २ कोटी ९० लाख रुपये खर्चून २१ खोल्यांची सर्व सोयी–सुविधांनी युक्त इमारत उभारण्यात आली. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे राहिले आहे.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून रोटरी क्लब अहिल्यानगर यांच्या माध्यमातून विद्यालयात आरओ प्लांट बसविण्यात आला असून, विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच आधुनिक शिक्षणाच्या गरजा लक्षात घेऊन यावर्षी मोरडे फाउंडेशन आणि सृष्टी युवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयाला १४ संगणक आणि २ प्रिंटर प्राप्त झाले आहेत. त्यामुळे विद्यालयात अत्याधुनिक आणि सुसज्ज संगणक व ए.आय. प्रयोगशाळा उभारण्यात आली असून, विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यास मोठी मदत होणार आहे.

पर्यावरण संवर्धनालाही त्यांनी विशेष प्राधान्य दिले आहे. विद्यालय परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्यात आली असून, यावर्षीही दहा रेन ट्री या बहुवर्षीय वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. विद्यालयाच्या विकासासाठी दिलेल्या या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांची उत्तर विभागीय समन्वय समिती सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. या नव्या जबाबदारीमुळे भविष्यातही त्यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य विद्यालयाला लाभणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# घरकामगारांच्या हक्कासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

## विविध मागण्यांसाठी निवेदनाद्वारे सरकारला इशारा

नगर – आंतरराष्ट्रीय घरकामगार दिनाचे औचित्य साधून अहमदनगर जिल्हा घरकामगार महिला संघटनेच्या वतीने घरकामगारांच्या प्रलंबित आणि न्याय्य मागण्यांसाठी सरकारी कामगार अधिकारी संदीप हरमळे यांना निवेदन सादर करण्यात आले. सीटूचे जिल्हा समन्वयक कॉम्रेड प्रवीण सोनवणे आणि घरकामगार प्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.



आंतरराष्ट्रीय घरकामगार दिनाचे औचित्य साधून अहमदनगर जिल्हा घरकामगार महिला संघटनेच्या वतीने घरकामगारांच्या प्रलंबित आणि न्याय्य मागण्यांसाठी सरकारी कामगार अधिकारी संदीप हरमळे यांना निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी बोलताना संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, २०११ मध्ये आंतरराष्ट्रीय श्रम परिषदेच्या १०० व्या अधिवेशनात घरकामगारांना ’कामगार’ म्हणून अधिकृत दर्जा मिळाला आणि ’सनद १८९’ अस्तित्वात आली. जगातील ३९ देशांनी या सनदेची अंमलबजावणी करत घरकामगारांना वेतन, रजा आणि पेन्शनचे कायदे लागू केले आहेत. मात्र, दुर्दैवाने भारत सरकारने अद्याप या सनदेवर स्वाक्षरी केलेली नाही. संसदेत वेळोवेळी विषय मांडूनही अद्याप घरकाम गारांसाठी स्वतंत्र कायदा झालेला नाही, त्यामुळे देशातील लाखो कामगार आजही अल्प वेतनावर आणि सामाजिक सुरक्षेविना जीवन जगत आहेत.

निवेदनात घरकामगारांसाठी मासिक २६ हजार रुपये किमान वेतन, साप्ताहिक सुट्टी आणि १५ दिवसांची पगारी रजा मिळावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. तसेच, महाराष्ट्र घरकामगार कल्याण मंडळाला वार्षिक २५० कोटींचा निधी मिळावा, नोंदणीची वयोमर्यादा ७० वर्षांपर्यंत वाढवावी आणि ही प्रक्रिया जिल्हा व तालुकास्तरावर विकेंद्रित करावी, असेही नमूद करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त ५५ वर्षे पूर्ण झालेल्या कामगारांना ५ हजार रुपये मासिक पेन्शन, ३० हजार रुपये मातृत्व लाभ, आणि पीएफ, ईएसआय तसेच विमा संरक्षण लागू करण्याची मागणी संघटनेने लावून धरली आहे. गृहनिर्माण संस्थांमध्ये घरकामगारांशी होणारा भेदभाव थांबवून त्यांच्यासाठी स्वतंत्र प्रवेशद्वार किंवा लिफ्टची सक्ती न करता सन्मानाची वागणूक मिळावी, अशी मागणीही करण्यात आली. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ रोखण्यासाठी समितीची स्थापना करावी, चार नवीन कामगार श्रम संहिता रद्द करून जुने २९ कामगार कायदे सुधारणांसह लागू करावेत, अशा विविध मागण्या या निवेदनाद्वारे शासनाकडे करण्यात आल्या आहेत.

या आंदोलनात राहेल तुजारे, मंजू साळवे, शितल घोरपडे, संगीता डाके, दिपाली शिंदे, वैशाली चांदणे यांच्यासह कॉम्रेड प्रवीण सोनवणे आणि कॉम्रेड सोमनाथ केंदळे प्रामुख्याने उपस्थित होते. आपल्या हक्कांच्या प्राप्तीसाठी घरकाम गार आता संघटित होत असून, सरकारने मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

# अहिल्यानगरमध्ये १०२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकावर यशस्वी प्रोस्टेट शस्त्रक्रिया

## एशियन नोबल हॉस्पिटलच्या युरोलॉजी विभागात डॉ. अमेय सांगळे यांची उल्लेखनीय कामगिरी

नगर – अतिवयोवृद्ध रुग्णांवर मोठ्या शस्त्रक्रिया करणे हे वैद्यकीय क्षेत्रातील मोठे आव्हान मानले जाते. अशा परिस्थितीत अहिल्यानगर येथील एशियन नोबल हॉस्पिटल येथे १०२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकावर यशस्वीपणे प्रोस्टेटची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया (TURP - Transurethral Resection of Prostate) करण्यात आली असून ही वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी मानली जात आहे.

सदर रुग्णाला वाढलेल्या प्रोस्टेटमुळे लघवीस गंभीर अडथळा निर्माण झाला होता. वारंवार मूत्रमार्गातील संसर्ग, लघवी पूर्णपणे बंद होणे तसेच कायमस्वरूपी कॅथेटरची गरज यामुळे त्यांचे दैनंदिन जीवन मोठ्या प्रमाणात प्रभावित झाले होते. वय १०२ वर्षे असल्याने रुग्ण व कुटुंबीयांमध्ये शस्त्रक्रियेबाबत नैसर्गिक भीती आणि साशंकता होती.

रुग्णाची संपूर्ण वैद्यकीय तपासणी करून हृदय, फुफ्फुसे, मूत्रपिंडांची कार्यक्षमता तसेच भूल देण्याच्या जोखमींचे बारकाईने मूल्यमापन करण्यात आले. या प्रक्रियेत ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ डॉ. बापूसाहेब कांडेकर यांनी रुग्णाच्या हृदयविकारासंदर्भातील जोखमींचे मूल्यमापन करून आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच भूलतज्ज्ञ डॉ. वैशणवी लोहोकरे यांनी अत्यंत काळजीपूर्वक भूल व्यवस्थापनाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली.



युरोलॉजिस्ट डॉ. अमेय सांगळे यांच्या नेतृत्वाखाली शस्त्रक्रिया करण्यात आली. कोणतीही बाह्य चिरफाड न करता दुर्बिणीद्वारे करण्यात आलेल्या या शस्त्रक्रियेमुळे वाढलेल्या प्रोस्टेटमुळे निर्माण झालेला अडथळा दूर करण्यात आला.

याबाबत माहिती देताना डॉ. अमेय सांगळे म्हणाले, अति वयोवृद्ध रुग्णावर शस्त्रक्रिया करताना प्रत्येक निर्णय अत्यंत विचारपूर्वक घ्यावा लागतो. वय हा एक घटक असला तरी रुग्णाची एकूण शारीरिक क्षमता आणि वैद्यकीय स्थिती यांचे योग्य मूल्यमापन अधिक महत्त्वाचे असते. अनुभवी वैद्यकीय टीम, आधुनिक तंत्रज्ञान आणि अचूक नियोजन यांच्या मदतीने अशा गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्येही उत्कृष्ट परिणाम साध्य करता येतात.

शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती समाधानकारक राहिली असून लघवीची समस्या पूर्णपणे दूर झाली आहे. अनेक महिन्यांपासून असलेली कॅथेटरची गरजही संपुष्टात आली असून रुग्णाला मोठा दिलासा मिळाला आहे.

वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, १०० वर्षांहून अधिक वयाच्या रुग्णावर TURP सारखी एंडोस्कोपिक प्रोस्टेट शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडणे हे अत्यंत दुर्मिळ आहे. त्यामुळे ही कामगिरी अहिल्यानगर जिल्ह्यासाठी विशेष अभिमानाची बाब मानली जात आहे.

यूरोलॉजीतील आधुनिक उपचार पद्धतीमुळे वाढलेला प्रोस्टेट, किडनी स्टोन, मूत्रमार्गातील अडथळे आणि इतर अनेक मूत्रविकारांवर कमी वेदनादायक आणि सुरक्षित उपचार उपलब्ध झाले आहेत. मात्र अनेक ज्येष्ठ नागरिक केवळ वयाच्या भीतीमुळे उपचार टाळतात. योग्य तज्ज्ञांचा सल्ला घेतल्यास आणि वेळेत निदान झाल्यास अतिवयोवृद्ध वयातही सुरक्षित व प्रभावी उपचार शक्य आहेत, हे या यशस्वी शस्त्रक्रियेतून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

एशियन नोबल हॉस्पिटलच्या युरोलॉजी विभागात प्रोस्टेटचे आजार, किडनी स्टोन, मूत्रमार्गातील अडथळे, पुरुषांमधील लघवीच्या समस्या, एंडोस्कोपिक व लेझर शस्त्रक्रिया तसेच विविध जटिल युरोलॉजिकल विकारांवर अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असून अनुभवी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांना सर्वसमावेशक उपचार दिले जातात. १०२ वर्षीय रुग्णावरील ही यशस्वी शस्त्रक्रिया ही केवळ वैद्यकीय उपलब्धी नसून आधुनिक वैद्यकशास्त्र, तज्ज्ञांचे कौशल्य आणि टीमवर्क यांच्या बळावर वयाच्या मर्यादांवर मात करता येते याचे प्रेरणादायी उदाहरण ठरली आहे.

# नवजात शिशू व बालरोग तज्ज्ञ डॉ.निखिलकुमार गुट्टे आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे पूर्णवेळ उपलब्ध होणार



नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे अद्ययावत सुविधा असलेला नवजात शिशू व बालरोग विभाग कार्यरत आहे. या विभागात आता अनुभवी नवजात शिशू व बालरोग तज्ज्ञ डॉ. निखिलकुमार गुट्टे पूर्णवेळ रूजू झाले आहेत. नवजात बाळांच्या विविध आजारांवर डॉ. गुट्टे योग्य निदान व उपचार मार्गदर्शन करत आहेत.

मुदतीपूर्वी जन्मलेल्या बाळाचे वजन कमी असणे, आईच्या पोटात शी करणे, कावीळ, जन्मल्यानंतर न रडणे, झटके येत असणे अशा विविध आजारांवर डॉ. गुट्टे यांचा प्रभावी उपचार करण्यात हातखंडा आहे. हॉस्पिटलमध्ये शासनाच्या महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचार सुविधा उपलब्ध आहे. अद्ययावत एनआयसीयू याठिकाणी आहे. नवजात बाळाच्या श्वासोच्छवासाच्या त्रासावर उपचार, बालदमा ए.आर.डी. एस.(श्वसन दाह), नवजात बालकांच्या कावीळीसाठी फोटो थेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, अनुवंशिक आजार व जन्मजात आजारांचे निदान व उपचार मार्गदर्शन, बालदमा तसेच लहान मुलांचे टू डी इको, एक्स रे, पॅथोलॉजी लॅब २४ तास उपलब्ध आहे.

नवजात शिशू व बालरोग तज्ज्ञ डॉ. निखिलकुमार गुट्टे मूळचे बीड जिल्ह्यातील आहेत. त्यांनी लातूर येथील एम.आय.एम. एस. आर. मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएस केले असून मुंबई आणि अंबाजोगाई येथील मेडिकल कॉलेजमध्ये त्यांनी वैद्यकीय उच्च शिक्षण घेतले आहे. त्यांच्या उपचार मार्गदर्शनाचा लाभ घेण्यासाठी रूग्णांनी आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आता गुडघा व खांदादुखी निवारणासाठी ‘अत्याधुनिक केंद्र’

## तज्ज्ञ डॉ. इताशा मडके यांच्या अनुभवी मार्गदर्शनाचा रूग्णांना लाभ



नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे आता गुडघेदुखी, खांदेदुखी आणि इतर सांधेदुखीने त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज निवारण केंद्र सुरू झाले आहे. याठिकाणी तज्ज्ञ डॉ. इताशा मडके (एमबीबीएस, एमडी, एफ.आय.पी.एम.) या पूर्णवेळ उपलब्ध आहेत. त्यांनी कोल्हापूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस केले आहे. पुण्यातील काशीबाई नवले महाविद्यालयातून त्यांनी एमडी ॲनेस्थेशिया ॲण्ड क्रिटिकल केअर अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. यानंतर त्यांनी मुंबईतील केईएम हॉस्पिटलमध्ये दीर्घकालीन वेदना उपचार शास्त्रात फेलोशिप प्राप्त केली आहे.

सोमवार ते शनिवार दुपारी १ ते २.३० यावेळेत आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे डॉ. मडके रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील. याठिकाणी अल्ट्रासाऊंड व सी– आर्म द्वारे अत्याधुनिक उपचार, डे केअर पद्धतीमुळे रूग्णालयात दाखल होण्याची गरज लागत नाही. गुडघेदुखी, सांधेदुखी, खांदा आखडणे म्हणजे आयुष्याची गती थांबली असे होत नाही. वयोमानानुसार गुडघ्याची गादी झिजणे, गुडघ्यातून आवाज येणे, जिना चढताना–उतरताना तीव्र कळ येणे, चालणे–उठणे–बसणे अवघड होणे, गुडघ्याच्या लिगामेंटला दुखापत या समस्यांवर शस्त्रक्रिया न करता उपचार शक्य आहे. अनेकदा रूग्णांना शस्त्रक्रिया नको असते, मधुमेह, हृदयरोग अशा आजारांमुळे गुडघ्यावर शस्त्रक्रिया करणे शक्य नसते. तसेच खांद्याच्या दीर्घकालीन समस्या, फ्रोजन शोल्डर, खांदा आखडणे, हात पाठीमागे न जाणे, हात वर उचलताना असह्य वेदना होणे, खांद्याच्या स्नायूवर सूज किंवा दुखापत, रात्री झोपताना खांद्यात असह्य वेदना होणे, इतर सांध्यांच्या वेदना, मनगट व कोपराच्या वेदना, टाचा दुखणे तसेच इतर दीर्घकालीन वेदनांवर प्रभावी उपचार व मार्गदर्शन याठिकाणी केले जाते.

प्रगत आणि विना शस्त्रक्रिया पद्धतीत अल्ट्रासाऊंड द्वारे वेदनेच्या अचूक जागेवर उपचार, रिजनरेटिव्ह थेरपी (पीआरपी थेरपी), आर.एफ.ए. (रेडिओ फ्रिक्वेन्सी अब्लेशन), इन्ट्रा आर्टीक्युलर इंजेक्शन असे अत्याधुनिक उपचार याठिकाणी केले जातात. त्यामुळे रूग्णांची अनेक दिवसांपासूनची समस्या दूर होण्यास मदत होते. वेदनामुक्त आयुष्यासाठी रूग्णांनी या आरोग्य सेवांचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१–२३२०४७३/७४/७५/७६.

# पद्मशाली समाजभूषण : कैं. गुरुवर्य पोट्यन्ना पापय्या बत्तीन

आधी केले पाहिजे मगच कार्य सिद्धीस जाते. हे ब्रीद आयुष्यभर जपून कै. गुरुवर्यं पोट्यन्ना बत्तीन यांनी पद्मशाली समाजासाठी कार्य केले. ‘सेस्ते आवुत दि सुस्ते कादु’ या युक्तीप्रमाणे आयुष्य जगले. येत्या २० जून रोजी त्यांची १३८ व्या जयंती निमित्त त्यांच्या कार्याचा आढावा घेणे समाजासाठी खुपच आवश्यक आहे.

पद्मशाली समाजातील पहिले पदवीधर म्हणुन कै. गुरुवर्य कै. गुरुवर्य पोट्यान्ना बत्तीन यांचे कार्य पद्मशाली समाजासाठी आदर्शवत व अभिमानाची गोष्ट राहिले आहे. समाजात जीवन जगत असताना अनेक कर्तृत्ववान व्यक्ती उदयास आलेले दिसून येतात. राष्ट्रपिता महात्मा गांधींपासून अण्णा हजारे, पोपटराव पवार, बाबासाहेब आमटे, सहकार महर्षी गपोळराव सोले पाटील असे अनेक नावे घेता येईल. कै. गुरुवर्य पोट्यान्ना बत्तीन यांचा देखील त्याच मांदियाळीत समावेश होतो. ज्यांनी आपल्या अफाट कार्यकर्तृत्वाने पद्मशाली समाजाला जागृत केले व त्यांचा शैक्षणिक प्रगतीचा मार्ग सुकर केला.

सन १८६१ साली आंध्रप्रदेशातील कायोरड्डी स्टेशनजवळील चिक्कूलामल्लयरेडी या गावाहून उदरनिर्वाहासाठी त्यांचा परिवार आपल्या अहिल्यानगरमध्ये दाखल झाला. २० जून १८८८ रोजी पोट्यन्ना यांचा जन्म झाला. ते लहान असतानाच १९०१ साली त्यांचे पितृछत्र हरपले. पापय्या गल्ली आज पोवेतो नाव असून त्यांचे स्मरण होते. अत्यंत हुशार व कुशाग्र बुद्धीमत्ता अगदी लहानपणातच दिसून आली. इयत्ता ४थी मध्ये मिडल स्कूल स्कॉलरशीप मिळवली. त्यावेळेस पद्मशाली समाजात शिक्षणाचे महत्त्व नव्हते, शिक्षणाचा प्रचार, प्रसार नव्हता अशा काळात एका विणकर कुटुंबातील तेलगू भाषिक मुलगा आपल्या कर्तृत्वाने शिक्षणात प्रगती करीत होता. त्या काळातील ही गोष्ट अत्यंत अभिमानाची होती.



(२० जून जयंतीनिमित्त)

त्यांचे शिक्षण चालू असतानाच त्यांचा विवाह १५ व्या वर्षी १९०३ साली लक्ष्मीबाई यांच्या बरोबर झाला. त्यांनी कौटुंबिक जबाबदारी सांभाळून शिक्षणात कुठेही खंड पडू दिला नाही. फर्ग्यूसन कॉलेज मधून इस.१९०९ साली बी.ए. ची परिक्षा उत्तीर्ण झाले. ते अखील भारतात पद्मशाली समाजातील पहिले पदवीधर म्हणून ओळखले जावू लागले.

शिक्षणाचा उपयोग समाजासाठी कशा प्रकारे करता येईल. उच्च पदाच्या नोकरीच्या संधी असतानाही कसलाच विचार न करता शिक्षकी पेशा पत्करला. नोकरीच्या निमित्ताने अनेक शहरातून फिरावे लागले. इ.स.१९१४ साली ते एस.टी.सी.डी. परिक्षा उत्तीर्ण झाले. त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली. शिक्षकी पेशात असताना आपल्या कार्याचा ठसा ठळकपणे उमटविला. जिद्द, चिकाटी, कष्ट, व्यासंग ही त्यांची वैशिष्ट्य ठरली. त्यांच्या कार्यपद्धतीचा गौरव कै. बनहट्टी यांनी त्यांच्या कार्यपद्धतीवर कुठलीच देखरेखीची आवश्यकता नाही असा गौरवपूर्ण शेरा मारला. यावरुनच त्यांच्या संपुर्ण कार्याची व कर्तव्यनिष्ठेची तळमळ दिसून येते. पुढे ते पुणे व आपल्या अहिल्यानगरचे ट्रेनिंग स्कुलचे प्राचार्य झाले. व त्यासाठी खूप कष्ट व मेहनत घेतली.

दुर्दम्य ज्ञानलालसा आणि अथक परिश्रमशिलता या गुणवैशिष्ट्यांमुळे त्यांनी अनेक शिक्षण संस्थांची आणि सामाजिक संस्थांची निर्मिती केली. इ.स. १९२० साली अहिल्यानगर येथे ‘पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाची’ स्थापना केली व पद्मशाली समाजातील आद्य प्रवर्तक ठरले. ‘शिका व संघटीत व्हा’ हा मंत्र समाजाला दिला. त्यांच्याकडे दुरदृष्टी असल्यामुळे केवळ शिक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत अहिल्यानगरमध्ये पद्मशाली पंचकमेटीची स्थापना केली. खऱ्या अर्थाने पद्मशाली समाज संघटीत झाला. समाजाची प्रगती व्हायची असेल तर म्युनिसीपालिटीमध्ये आपल्या समाजाचे प्रतिनिधी पाठविणे गरजेचे आहे हे मत ठामपणे त्यांनी मांडले व तशी कार्यवाही देखील केली. त्यांच्या निवृत्तीनंतरही त्यांचे सामाजिक कार्य व समाजाला मार्गदर्शन सतत चालू होते. राज्यातील पुणे, सोलापूर, जालना, मुंबई अशा मोठ्या शहरातील पद्मशाली समाज पोट्यांन्ना यांना मार्गदर्शनासाठी निमंत्रण देत असत. १९१७ ते १९२० या काळात तेलगू समाचारमध्ये लेख लिहून समाज बांधवांना बहुमोल मार्गदर्शन केले.

त्यांनी आपली कर्म पद्धतीवरील एक निष्ठा कधीच ढळू दिली नाही. समाजासाठी आपले जीवन अर्पित केले. आपल्या भविष्य निर्वाह निधीची सर्व रक्कम त्यांनी ‘पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाला शैक्षणिक कार्याला देवून समाजात आदर्श दाखवून दिला. साधे राहणीमान व उच्च विचार या विचारांती ध्येय वेडे होते. ते आमच्या पद्मशाली समाजाचे ऋषीतुल्य होते.

त्यांचे विचार समाजासाठी कायमच प्रेरणादायी व प्रोत्साहन पर असेच राहिले यात तिळमात्र शंका नाही. सतत कार्य करीत राहावे चांगले म्हटल्यास उत्तमच वाईट म्हटले तर पर्वा करू नये त्यांच्या आजच्या २० जून जयंतीच्या स्मृतीस विनम्र अभिवादन! जय श्री मार्कंडेय!

**– कृष्णा संभार,**
मो. ९९२२१८९९३८ सहसचिव,
कै. गुरुवर्य पोट्यन्ना बत्तीन शैक्षणिक व सामाजिक मंडळ, अहिल्यानगर

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## बुडालेल्या जहाजातील खजिना मिळाला

कोलंबियाच्या किनारपट्टीवर ३०० वर्षांपूर्वी 'सॅन जोस गॅलियन' जहाजासोबत बुडालेला मौल्यवान खजिना आता जगासमोर येत आहे. जहाजातून इन्स्टिट्यूट ऑफ अँथ्रोपोलॉजी अँड हिस्ट्रीच्या संचालक अलहेना यांनी सांगितले की, या वस्तू बाहेर काढल्यामुळे कैसेडो फर्नांडिस 'नागरिकांना 'सॅन जोस गॅलियन 'च्या इतिहासाकडे भौतिक पुराव्यांद्वारे संपर्क साधण्याची संधी मिळते.'



सॅन जोस हे ६२ तोफा असलेले स्पॅनिश गॅलियन होते. जून १७०८ मध्ये, हे जहाज दक्षिण अमेरिकेहून युरोपला १८ जहाजांच्या ताफ्याचे नेतृत्व करत असताना ब्रिटिश युद्धनौकांनी या जहाजावर हल्ला केला. या लढाईदरम्यान जहाज बुडाले आणि जहाजावरील ६०० कर्मचारी आणि प्रवासी मारले गेले. (जहाज स्फोटामुळे बुडाले की नाही, याबद्दल संशोधकांमध्ये मतभेद आहेत.) संशोधकांना अखेरीस २०१५ मध्ये, कार्टाजेना शहराच्या दक्षिणेस आणि पृष्ठभागापासून सुमारे २,००० फूट (६०० मीटर) खाली हे जहाज सापडले. या शोधामुळे कोलंबिया सरकार, स्पेन, एक अमेरिकन कंपनी आणि स्वदेशी बोलिव्हियन 'कारा कारा' राष्ट्र यासह अनेक पक्षांनी या जहाजावर आणि त्याच्या मौल्यवान खजिन्यावर मालकी हक्क सांगितला होता. परंतु, कोलंबिया सरकारने आपल्या पाण्यातील सर्व बुडालेली जहाजे देशाची मालमत्ता असल्याचा निर्णय दिला आणि तेव्हापासून जहाज आणि त्यातील वस्तूंचे सर्वेक्षण सुरू केले. हा नवीन शोध प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचा भाग आहे, ज्याचा उद्देश जहाजातून वस्तू बाहेर काढणे आणि त्यांचे जतन करणे आहे. बाह्य काढलेल्या वस्तूंमध्ये हे समाविष्ट आहे : एक कांस्य तोफ आणि त्याच्याशी संबंधित दोरी, लाकूड आणि धातूचे तुकडे. तीन कांस्य आणि सोन्याची नाणी. दोन संपूर्ण पोर्सिलेनचे कप आणि अनेक पोर्सिलेनचे तुकडे. या वस्तू रोबोटिक उपकरणांचा वापर करून बाहेर काढण्यात आल्या आणि त्यांचे जतन करण्यासाठी त्यांना जहाजावर त्वरित हलवण्यात आले. तोफ एका रेफ्रिजरेटेड कंटेनरमध्ये ठेवली गेली, तर नाणी खराब होऊ नयेत म्हणून मिठाच्या पाण्यात साठवण्यात आली.

बाहेर काढलेल्या वस्तूंमध्ये तोफ, पोर्सिलेनचा कप आणि तीन नाणी यांचा समावेश आहे. या वस्तू अत्यंत चांगल्या स्थितीत जतन झालेल्या आहेत आणि त्या या जहाजाच्या प्रचंड संपत्तीची केवळ एक झलक आहेत.

'सॅन जोस गॅलियन' हे जहाज 'जहाज बुडण्याचा पवित्र ग्रंथ' (The Ho$ly Grail of sh{iwrecks) म्हणून ओळखले जाते; कारण ते सुमारे २०० टन (१८० मेट्रिक टन) सोने, चांदी आणि रत्ने घेऊन बुडाले होते, ज्याचे मूल्य २०१८ मध्ये सुमारे १८ अब्ज डॉलर्स इतके होते. या मौल्यवान कलाकृती शोधून काढणे आणि जतन करणे, हा कोलंबिया सरकारचा एक सध्या सुरू असलेला प्रकल्प आहे.

## 'हँगिंग कॉफिन'चे गूढ उकलले

हजारो वर्षांपासून, सध्याच्या नैऋत्य चीनमध्ये राहणाऱ्या एका वांशिक गटाने त्यांच्या मृतांना कड्यांच्या बाजूला 'हँगिंग कॉफिन' (टांगलेल्या शवपेट्या) मध्ये ठेवले होते. मात्र, त्यांची ओळख अनेक वर्षांपासून संशोधकांसाठी गूढ राहिली होती. आता एका नवीन जनुकीय अभ्यासातून असे दिसून आले आहे की, ही प्राचीन अंत्यसंस्काराची परंपरा आजूबाजूच्या प्रदेशात आजही राहणाऱ्या लोकांच्या पूर्वजांनी केली होती.

संशोधकांना असेही आढळले की, 'टांगलेल्या शवपेट्या' (ज्यामध्ये लाकडी शवपेट्या उघड्या कड्यांवर खिळल्या जात असत) ही परंपरा पाळणारे प्राचीन लोक आणि चीनच्या दक्षिणेकडील व आग्नेय आशियाच्या किनाऱ्यांवर राहणारे निओलिथिक (नवपाषाण युगातील) लोक यांच्यात जनुकीय संबंध आहेत. 'या अंत्यसंस्काराच्या प्रथेच्या जनुकीय, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक मुळांबद्दल मौल्यवान माहिती मिळते,' असे संशोधकांनी त्यांच्या अभ्यासामध्ये लिहिले आहे. हा अभ्यास 'नेचर कम्युनिकेशन्स' या जर्नलमध्ये प्रकाशित झाला. गेल्या ३० वर्षांमध्ये संशोधकांनी चीन आणि आग्नेय आशियामध्ये शेकडो हँगिंग कॉफिनचे दस्तऐवजीकरण केले आहे. ऐतिहासिक नोंदी आणि मौखिक परंपरांमधून असे दिसून येते की, 'बो' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका लहान वांशिक गटाने ही प्रथा सुरू केली होती. परंतु, या नवीन अभ्यासासाठी संशोधकांनी हे रहस्य कायमस्वरुपी सोडवण्यासाठी जनुकीय



विज्ञानाची मदत घेतली. संशोधकांनी त्यांच्या तपासणीत चीनमधील चार 'हँगिंग कॉफिन' स्थळांवर असलेल्या ११ व्यक्तींच्या जनुकीय माहितीचे विश्लेषण केले, त्यापैकी काही लोक २,००० वर्षांपूर्वी राहत होते.

याव्यतिरिक्त, त्यांनी वायव्य थायलंडमधील एका गुहेत सापडलेल्या प्राचीन 'लॉग कॉफिन' (मोठ्या लाकडी खोडाच्या पेट्या) मध्ये असलेल्या चार व्यक्तींच्या अवशेषांची तपासणी केली, ज्यापैकी सर्वात जुने अवशेष २,३०० वर्षांपूर्वीचे आहेत. तसेच त्यांनी 'बो' वंशाच्या सध्या जिवंत असलेल्या ३० लोकांच्या जनुकीय नमुन्यांचादेखील अभ्यास केला. या निष्कर्षांवरून असे सूचित होते की, 'हँगिंग कॉफिन'वाले लोक आणि त्यामुळे आधुनिक 'बो' लोक हे सुमारे ४,००० ते ४,५०० वर्षांपूर्वी निओलिथिक काळात (इ.स.पूर्व १०,००० ते इ.स.पूर्व २,००० पर्यंत) या प्रदेशात राहणाऱ्या गटांशी जनुकीयदृष्ट्या जोडलेले होते.

## एलॉन मस्कची भारतीय सखी

एलॉन मस्क यांच्या श्रीमंतीसमवेत आणखी एक चर्चेत असणारा मुद्दा म्हणजे त्यांचं खासगी आयुष्य. नुकतंच मस्क यांनी एका पॉडकास्टमध्ये हजेरी लावत अनेक मुद्द्यांवर भाष्य केलंय, ज्यामध्ये सर्वात चर्चेत राहून गेलेला मुद्दा ठरला मस्क यांच्या खासगी आयुष्याबद्दलचा. प्रचंड श्रीमंती असणाऱ्या मस्क यांच्या एकाहून अधिक पार्टनरपैकी एक पार्टनर ही भारतीय वंशाची असल्याचंही त्यांनी सांगितलं. आपली पार्टनर आणि 'न्यूरालिंक'ची अधिकारी शिवोन जिलिस ही भारतीय वंशाची असून, आपण तिच्या–आपल्या मुलाचं नाव 'शेखर' असं ठेवल्याचंही ते म्हणाले. प्रसिद्ध भारतीय अमेरिकी शास्त्रज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते सुब्रमण्यन चंद्रशेखर यांच्या सन्मानार्थ मस्क यांनी हे नाव निवडलं. शिवाय, त्यांनी अमेरिकेत कैक भारतीयांनी दिलेल्या योगदानाकडेही सर्वांचं लक्ष वेधलं.

झेरोधाचे सहसंस्थापक निखिल कामथशी संवाद साधताना मस्क यांनी आपली पार्टनर शिवोन जिलिस हिच्याबद्दलसुद्धा अनेक रंजक गोष्टी सांगितल्या. 'माझी पार्टनर शिवोन, ती अर्धी भारतीय आहे, शिवोनच्या एका मुलाचं नाव शेखर आहे,' असं मस्क म्हणाले. महान भारतीय अमेरिकी शास्त्रज्ञ सुब्रमण्यन चंद्रशेखर यांच्या नावावरून त्याचं नाव ठेवलं असून, त्यांना १९८३ मध्ये 'नोबेल' पारितोषिकानं गौरवण्यात आलं होतं. शिवोन कधी भारतात आलीये का? असं विचारलं असता, तिच्या वडिलांचा वंश भारतातीलच आहे; मात्र ती भारतात मोठी झालेली नाही, असं मस्क यांनी सांगितलं. शिवोन कॅनडामध्ये मोठी झाली असून, तिला लहानपणीच




दत्तक घेण्यात आलं होतं. असं म्हणतात की, तिचे खरे वडील एकेकाळी विश्वविद्यालयात एक्स्चेंज स्टुडंट होते; पण आपल्याला याबद्दलची सविस्तर माहिती नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

मस्क यांची जवळची सहकारी असणारी शिवोन जिलिस अनेक वर्षांपासून टेक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात कार्यरत आहे. २०१७ मध्ये ती 'न्यूरालिंक'शी जोडली गेली आणि आजच्या घडीला ती या कंपनीमध्ये ऑपरेशन, स्पेशल प्रोजेक्ट डायरेक्टर आहे. शिवोनचा जन्म आणि तिचं संगोपन कॅनडातील ओंटारियोमध्ये झालं. येल विद्यापीठातून तिनं अर्थशास्त्राचं शिक्षण घेतलं. आईस हॉकीमध्ये ती गोलकीपरही होती. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तिनं आयबीएम आणि 'ब्लूमबर्ग'मध्ये काम करत स्टार्टअप पार्टनरशिपचीही जबाबदारी सांभाळली.

## जगावेगळ्या डॉक्टरची यशोगाथा



डॉक्टर बनणे हे लाखो विद्यार्थ्यांचे स्वप्न असते; पण हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आलेल्या अडचणींवर मात करणे सोपे नसते. गुजरातच्या भावनगर येथील गणेश बरैया यांनी जो संघर्ष केला, तो खऱ्या अर्थाने प्रेरणा देणारा आहे. गणेश बरैया यांची उंची केवळ ३ फूट आणि वजन फक्त २० किलो आहे; पण त्यांच्या स्वप्नांची उंची इतकी मोठी होती की, कोणताही अडथळा त्यांना रोखू शकला नाही.

गणेश बरैया एका सामान्य कुटुंबातून येतात आणि आठ भावंडांपैकी एक आहेत. लहानपणापासूनच त्यांना बुटकेपणाची समस्या होती. मात्र, त्यांचे डॉक्टर बनण्याचे आणि लोकांची सेवा करण्याचे स्वप्न होते. २०१८ मध्ये जेव्हा त्यांनी एमबीबीएसमध्ये प्रवेशासाठी अर्ज केला, तेव्हा मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने त्यांना प्रवेश देण्यास नकार दिला; कारण त्यांची उंची डॉक्टर बनण्यासाठी योग्य नाही, असे सांगण्यात आले. हा नकार ऐकून कोणीही हार मानली असती; पण गणेश यांनी हिंमत सोडली नाही. गणेश बरैया यांनी आपल्या शाळेचे प्राचार्य डॉ. दलपतभाई कटारिया यांच्या मदतीने कायदेशीर लढाई सुरू केली. त्यांनी आधी गुजरात उच्च न्यायालयात धाव घेतली; पण तिथेही निराशा मिळाली. तरीही त्यांनी धीर सोडला नाही आणि सुप्रीम कोर्टाचा दरवाजा ठोठावला. चार महिन्यांच्या प्रदीर्घ कायदेशीर लढाईनंतर, सुप्रीम कोर्टाने ऐतिहासिक निर्णय दिला.

न्यायालयाने स्पष्ट केले की, उंची कोणाच्याही स्वप्नांना अडवू शकत नाही आणि गणेश यांना एमबीबीएसमध्ये प्रवेश मिळाला. प्रवेश मिळाल्यावरही गणेश यांचा संघर्ष थांबला नाही. वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेणे सोपे नव्हते. लॅबमध्ये पोहोचणे, क्लासरूममध्ये बसणे, इंटर्नशिप करणे... या प्रत्येक कामात त्यांना अडचणींचा सामना करावा लागला; पण त्यांनी आपल्या हिंमत, मेहनत आणि कुटुंबीयांच्या पाठिंब्याने प्रत्येक आव्हान पार केले. आज इतक्या अडचणींनंतर, गणेश बरैया गुजरात सरकारमध्ये मेडिकल ऑफिसर म्हणून कार्यरत आहेत. ते लोकांवर उपचार करतात, त्यांचे प्राण वाचवतात आणि त्यांच्या यशाने सर्वांना प्रेरणा देत आहेत. त्यांची इच्छा आहे की, ते त्यांच्या आईसाठी पक्के घर बनवतील; कारण आजही त्यांचे कुटुंब कच्च्या घरात राहते. ते आपल्या कुटुंबाला चांगले आयुष्य देऊ इच्छितात आणि ज्या मुलांची स्वप्ने आर्थिक किंवा शारीरिक अडचणींमध्ये अडकतात, त्यांना मदत करू इच्छितात.



## लाखो वर्षांपासून ॲनाकोंडा महाकायच

ॲनाकोंडा जातीचे महाकाय साप लाखो वर्षांपासून त्यांच्या सध्याच्या प्रचंड आकारातच अस्तित्वात आहेत, असे एका नवीन अभ्यासात दिसून आले आहे. या प्रचंड सापांचा सरासरी आकार सुमारे १२.४ दशलक्ष वर्षांपूर्वी, मध्य मायोसीन युगादरम्यान (१६ दशलक्ष ते ११.६ दशलक्ष वर्षांपूर्वी) जीवाश्म नोंदीत प्रथम दिसल्यापासून सातत्याने तोच राहिला आहे, अशी माहिती संशोधकांनी जर्नल ऑफ वर्टेब्रेट पॅलिओन्टोलॉजीमध्ये प्रकाशित झालेल्या एका नवीन अभ्यासात दिली.

मध्य आणि वरच्या मायोसीन युगात (१२.४ दशलक्ष ते ५.३ दशलक्ष वर्षांपूर्वी), उष्ण तापमान, विस्तृत दलदलीचे प्रदेश आणि मुबलक अन्न यामुळे अनेक प्राण्यांच्या प्रजाती त्यांच्या आधुनिक नातेवाईकांपेक्षा खूप मोठ्या झाल्या होत्या. परंतु, यातील फार कमी महाकाय प्राणी आजतागायत टिकून आहेत. 'महाकाय मगर (giant crocodiles) आणि महाकाय कासव (giant turtles) यांसारख्या इतर प्रजाती मायोसीननंतर नामशेष झाल्या, कदाचित जागतिक तापमान थंड होणे आणि अधिवास कमी झाल्यामुळे,' असे या अभ्यासाचे सह–लेखक आणि केंब्रिज विद्यापीठातील कशेरुका जीवाश्मशास्त्रज्ञ अँड्रेस आल्फोन्सो–रोजास यांनी एका निवेदनात सांगितले. 'परंतु, महाकाय ॲनाकोंडा वाचले आहेत, ते वातावरणाला जुळवून घेण्यात कुशल आहेत.'ॲनाकोंडा हे अजगराप्रमाणे पिळून मारणाऱ्या सापांच्या गटातील आहेत, ज्यात जगातील सर्वात जड सापाच्या प्रजातींचा समावेश होतो. आधुनिक ॲनाकोंडाची सरासरी लांबी १३ ते १६ फूट (४ ते ५ मीटर) असते. सर्वात मोठा ॲनाकोंडा साप २३ फूट (७ मीटर) पर्यंत पोहोचू शकतो. मायोसीन युगात ॲनाकोंडा याहून मोठे होते की त्यांचा आकार तेव्हाही सारखाच होता, याबद्दल वैज्ञानिकांना निश्चित माहिती नव्हती. प्राचीन ॲनाकोंडाचा आकार किती मोठा असेल याचा अंदाज घेण्यासाठी, आल्फोन्सो–रोजास आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी व्हेनेझुएलातून गोळा केलेल्या किमान ३२ वेगवेगळ्या सापांच्या १८३ जीवाश्मित ॲनाकोंडा मणक्यांचे मोजमाप केले.

त्यांनी संबंधित सापांच्या वैशिष्ट्यांवरून प्राचीन ॲनाकोंडाच्या शरीराच्या लांबीचा अंदाज लावण्यासाठी 'पूर्वज अवस्था पुनर्बांधणी' नावाच्या तंत्राचादेखील वापर केला. या गणनांवर आधारित, या टीमला असे आढळले की, ॲनाकोंडा मायोसीनमध्ये १२ दशलक्ष वर्षांपूर्वी पहिल्यांदा दिसले तेव्हा त्यांची सरासरी लांबी सुमारे १७ फूट (५.२ मीटर) होती, जी आधुनिक ॲनाकोंडाच्या लांबीएवढीच आहे. आल्फोन्सो–रोजास म्हणाले, 'हा एक आश्चर्यकारक परिणाम आहे कारण जागतिक तापमान जास्त असताना मायोसीनमधील प्राचीन ॲनाकोंडा सात किंवा आठ मीटर २३ ते २६ फूट लांब असतील अशी आम्हाला अपेक्षा होती. परंतु, आम्हाला त्याहून मोठ्या सापाचे कोणतेही पुरावे मिळालेले नाहीत.' ॲनाकोंडाचा आकार वेळेनुसार लहान का झाला नाही हे अजूनही स्पष्ट झालेले नाही.

## थंडीत संत्र्याचे सेवन करावे का?



हंगामी आजारांपासून वाचण्यासाठी हंगामी फळांचे सेवन करणे अत्यंत आवश्यक आहे, यावर नेहमीच भर दिला जातो. सध्या थंडीचा काळ असल्यामुळे या हंगामात येणाऱ्या भाज्या आणि फळे आहारात समाविष्ट करून तुम्ही तंदुरुस्त आणि निरोगी राहू शकता, असे आहारतज्ज्ञ सांगतात. हिवाळ्यामध्ये संत्र्याचे सेवन करणे अत्यंत लाभदायक आहे. याला 'सुपरफूड' म्हटले जाते, जे शरीराला एक–दोन नव्हे, तर अनेक फायदे देते.

तज्ज्ञांच्या मते, हिवाळ्याच्या काळात रोगप्रतिकारकशक्ती अनेकदा कमकुवत होते. यामुळे सर्दी, खोकला, ताप आणि व्हायरल इन्फेक्शनचा धोका वाढतो. अशा परिस्थितीत संत्री एक नैसर्गिक 'इम्यून बूस्टर' म्हणून काम करते. संत्र्याची चव गोड आणि किंचित आंबट असते. हे जगातील सर्वात पौष्टिक आणि स्वादिष्ट फळांपैकी एक आहे. संत्री हे कमी कॅलरी असलेले फळ असले, तरी ते पोषणतत्त्वांनी परिपूर्ण आहे. यामध्ये 'क' जीवनसत्त्वाची मात्रा खूप जास्त असते, जी शरीराची रोगप्रतिकारकशक्ती वाढविण्यात मदत करते. यामुळेच डॉक्टर आणि पोषणतज्ज्ञ विशेषतः हिवाळ्यात दररोज संत्रे खाण्याचा सल्ला देतात. संशोधनानुसार, जर एखादी व्यक्ती रोज एक संत्री खात असेल, तर त्याला संपूर्ण दिवसाची ९०–१०० टक्के 'क' जीवनसत्त्वाची गरज पूर्ण होते. संत्र्याचा ८६ टक्के भाग पाण्याने बनलेला असतो.


यात फायबर, कॅल्शियम, पोटॅशियम आणि फोलेट यासारखी अनेक आवश्यक पोषणतत्त्वे आढळतात. हे हंगामी आजारांपासून संरक्षण करण्याचे काम करते. संत्र्यामध्ये लोह नसले, तरी त्यात असलेले 'क' जीवनसत्त्व शरीराला लोह शोषून घेण्यास मदत करते. यामुळे हिमोग्लोबिन वाढते आणि ॲनिमियाचा (रक्तक्षय) धोका कमी होतो. संत्र्यामध्ये असलेले अँटिऑक्सिडंटसब शरीरातील फ्री रॅडिकल्स नष्ट करण्यास मदत करतात, ज्यामुळे कर्करोगाचा धोका कमी होऊ शकतो. संत्र्यामध्ये असलेले मॅग्नेशियम आणि 'बी ६' जीवनसत्त्व रक्तदाब नियंत्रणात ठेवते.

हे हृदय निरोगी ठेवण्यासही मदत करते. मधुमेह रुग्णांसाठीही संत्रे फायदेशीर आहे; कारण त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो आणि त्यातील फायबर रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत करते. संत्रे हाडे मजबूत करण्यासाठी आणि शरीरातील सूज कमी करण्यास मदत करते. तसेच, वजन कमी करण्यासाठी ते उपयुक्त आहे; कारण त्यात कॅलरी कमी आणि फायबर जास्त असते. यामुळे पोट जास्त काळ भरलेले वाटते आणि जास्त खाणे टाळले जाते.

## तोंडावर पांघरुण घेऊन झोपताय?

थंडीच्या रात्री पांघरुणात स्वतःला पूर्णपणे झाकून घेणे आराम आणि सुरक्षितता देते. आपण पांघरुण तोंडापर्यंत ओढल्याबरोबर आतमध्ये एक उबदार जागा तयार होते, जी बाहेरची थंड हवा, प्रकाश आणि आवाजापासून संरक्षण करते. अनेक लोक या सवयीमध्ये इतका आराम अनुभवतात की त्यांना याच पद्धतीने झोपायला आवडते. पण, ही आरामदायक सवय तुमच्या शरीरावर कसा परिणाम करते, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

जेव्हा आपण चेहरा झाकून झोपतो, तेव्हा पांघरुणाखाली एक उबदार आणि सुरक्षित वातावरण तयार होते. ही उष्णता केवळ आरामच देत नाही, तर मेंदूलाही शांत करते, ज्यामुळे लवकर झोप लागते. पांघरुणाखाली अंधार आणि शांतता मिळाल्याने मेंदूची हालचाल कमी होते आणि आपण लवकर 'रिलॅक्स' होतो. मात्र चेहरा झाकून झोपल्यास पांघरुणाखाली कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढते आणि ताज्या ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते. तीच गरम, शिळी हवा वारंवार श्वासात घेतल्याने पुढील समस्या उद्भवू शकतात. झोप वारंवार तुटू शकते.



सकाळी उठल्यावर थकवा जाणवू शकतो. डोकेदुखी, चक्कर येणे किंवा लक्ष केंद्रित करण्यात अडचण येऊ शकते. ज्या लोकांना ॲलर्जी, सायनस किंवा अस्थमाचा त्रास आहे, त्यांची लक्षणे वाढू शकतात. पांघरुणाने चेहरा झाकल्यास त्वचेभोवती ओलावा आणि उष्णता वाढते. अशा प्रकारच्या वातावरणात त्वचेला त्रास होऊ शकतो. याशिवाय, पांघरुणामध्ये जमा झालेली धूळ, तेल आणि जीवाणू यांचा चेहऱ्याशी दीर्घकाळ संपर्क येणे देखील हानिकारक आहे. लहान मुलांसाठी चेहरा झाकून झोपणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. ते स्वतःची चादर किंवा पांघरुण व्यवस्थित बाजूला करू शकत नाहीत, ज्यामुळे हवेचा मार्ग पूर्णपणे बंद होऊ शकतो. यामुळे श्वास गुदमरण्याचा धोका असतो. तुम्हाला उबदारपणा आवडत असेल, तर थर असलेले पांघरुण किंवा जाड रजई वापरा, पण चेहरा उघडा ठेवा. गरम कपडे, मोजे किंवा थर्मल वेअर घाला. डोळ्यांवर प्रकाश नको असेल तर 'आय मास्क' वापरा.

## चंद्राच्या जन्माबाबत नवे संशोधन

सुमारे ४.५ अब्ज वर्षांपूर्वी पृथ्वीच्या सुरुवातीच्या इतिहासातील सर्वात महत्त्वपूर्ण घटनांपैकी एक असलेल्या, चंद्राला जन्म देणाऱ्या त्या महाकाय टक्करीला, एका दूरच्या अनोळखी ग्रहाने नाही, तर पृथ्वीच्या अगदी शेजारी वाढलेल्या एका 'जुळ्या' ग्रहाने जन्म दिला असावा, असे एका नवीन अभ्यासात समोर आले आहे.



जर्मनीतील मॅक्स प्लँक इन्स्टिट्यूट फॉर सोलर सिस्टीम रिसर्चचे भू–वैज्ञानिक टीमओ हॉप यांच्या नेतृत्वाखालील या नवीन विश्लेषणामध्ये अपोलो मोहिमेतील चंद्राचे नमुने, पृथ्वीवरील खडक आणि उल्कापिंड यांचा अभ्यास करण्यात आला. हॉप यांनी सांगितले की, 'थिया' आणि आदि–पृथ्वी (प्रोटो–अर्थ) हे अंतर्गत सूर्यमालेतील एकाच प्रकारच्या भागातून आले आहेत. 'सायन्स' या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या या निष्कर्षांमुळे अब्जावधी वर्षांपूर्वी खडकाळ ग्रहांची निर्मिती कशी झाली, याच्या शास्त्रीय चित्राला बळकटी मिळाली आहे, असे हॉप म्हणाले.

सूर्य निर्माण झाल्यानंतरच्या पहिल्या १०० दशलक्ष वर्षांच्या अस्थिर काळात, अंतर्गत सूर्यमाला डझनाहून अधिक ते शेकडो ग्रहांच्या भ्रूणांनी गजबजलेली होती. चंद्राच्या आकाराचे ते मंगळाच्या आकाराचे हे ग्रह, ग्रहांच्या निर्मितीतील गुरुत्वाकर्षणाच्या गोंधळामुळे, तसेच गुरु ग्रहाच्या प्रचंड ओढामुळे वारंवार आदळत, विलीन होत किंवा नवीन कक्षांमध्ये फेकले जात होते.

# सीए फायनल परिक्षेमध्ये नगरच्या वेदांत मंत्री याचा देशात २६ वा क्रमांक



नगर – इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियातर्फे घेण्यात आलेल्या मे २०२६ च्या सीए फायनल परीक्षेचा निकाल जाहीर झाला. या परीक्षेत अहिल्यानगरच्या वेदांत नितीन मंत्री याने देशपातळीवर २६ वा क्रमांक पटकावून शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

विशेष म्हणजे, वेदांत ने हे यश पहिल्याच प्रयत्नात मिळवले आहे. सीए सारखी अत्यंत कठीण मानली जाणारी परीक्षा पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होणे हेच मोठे आव्हान असते. त्यात देशभरातील लाखो विद्यार्थ्यांमधून 'टॉप ३०' मध्ये स्थान मिळवणे ही असामान्य कामगिरी आहे. त्याचप्रमाणे अमेरिकेच्या 'सीएफए' परीक्षेच्या दोन लेवल त्याने पहिल्याच प्रयत्नात पास केलेल्या आहेत. त्याने यापूर्वीच्या सीए इंटरमिजिएटच्या परीक्षेत भारतात बारावा क्रमांक मिळविला होता. सीए फाउंडेशन परीक्षेत नगर शहरात दुसरा क्रमांक मिळविला होता.

चि. वेदांत याने सी.ए.फाऊंडेशन, सी.ए. इंटरमिजिएट व सी.ए. फायनल तिन्ही कोर्सचे ऑनलाईन लेक्चर घरी बसून पूर्ण केले. स्वतःची जिद्द व अथक परिश्रमाने त्याने हे यश मिळवत नगरचे नाव देशपातळीवर पोहचविले. तो व्यापारी रामनारायण मंत्री आणि एडीसीसी बँकेचे निवृत्त एमडी आर.डी. मंत्री यांचा नातू तर व्यापारी नितीन व सौ. कविता मंत्री यांचा मुलगा आहे. चि. वेदांत याचे शालेय शिक्षण सेंट मायकेल स्कूलमध्ये झाले होते तर बारावी श्रीरामकृष्ण एज्युकेशन कॉलेजमध्ये पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला होता. बीकॉम सारडा कॉलेजमधून उत्तीर्ण झालेला होता.

# लाच मागणाऱ्या ३ पोलिस कर्मचाऱ्यांना रंगेहाथ पकडले; नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची मोठी कारवाई

नगर – जिल्हा पोलीस दलातील वाढत्या लाचखोरीच्या घटनांमध्ये आणखी एका गंभीर प्रकरणाची भर पडली आहे. अपघात प्रकरणात गुन्हा दाखल करण्यासाठी सात हजार रूपयांची लाच मागितल्याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यातील तीन पोलीस कर्मचार्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. विशेष म्हणजे एका सापळा कारवाईत पोलीस दलातील तीन जण अडकल्याने जिल्हा पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

नितीन अशोक गाडगे (वय ४४), राजेश रावसाहेब जाधव (वय ३८) आणि दादाराम शिवराम म्हस्के (वय ५६) अशी पकडलेल्या तीन कर्मचार्यांची नावे आहेत. तिघांविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदाराच्या भावाचा १ जून रोजी अपघात झाला होता. त्यानंतर दौंड पोलिसांनी जखमीचा जबाब नोंदवून पुढील कारवाईसाठी प्रकरण श्रीगोंदा पोलीस ठाण्याकडे वर्ग केले होते. अपघाताचा गुन्हा दाखल करण्याची जबाबदारी नितीन गाडगे याच्याकडे होती. तक्रारदाराने गाडगे याची भेट घेतल्यानंतर त्याला अपघाताची माहिती ॲपमध्ये भरण्याचे काम पाहणारा राजेश जाधव याच्याकडे पाठविण्यात आले. त्यावेळी जाधव याने अपघाताची माहिती प्रणालीमध्ये नोंदवून गुन्हा दाखल करण्यासाठी स्वतःसह नितीन गाडगे याच्यासाठी १० हजार रूपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे. याबाबत तक्रारदाराने १४ जून रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली.

१६ जून रोजी लाच मागणी पडताळणीत नितीन गाडगे याने तडजोडीअंती सात हजार रूपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर १८ जून रोजी सापळा रचण्यात आला. कारवाईदरम्यान राजेश जाधव याने तक्रारदाराला कोणताही अधिकार नसलेल्या पोलीस चालक दादाराम म्हस्के याच्याकडे पाठविले. म्हस्के यानेही गाडगे याने मागितल्याप्रमाणे सात हजार रूपयांची लाच स्वीकारण्याची तयारी दर्शविली. सापळा कारवाईदरम्यान त्याने तक्रारदाराकडून सात हजार रूपयांची लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्याला रंगेहाथ ताब्यात घेतले.

तपासात या संपूर्ण व्यवहारात गाडगे आणि जाधव यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजू आल्हाट यांच्या पथकातील अंमलदार चंद्रकांत काळे, किशोर कुळधर, शेखर वाघ, दशरथ लाड यांच्या पथकाने केली. पोलीस निरीक्षक छाया देवरे पुढील तपास करीत आहेत.

# 'एनसीएमसी कार्ड' बाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी; मुदतवाढीची लाभार्थ्यांची मागणी

## स्वाती सिरसुल यांचे निवेदन; नागरिकांमध्ये संभ्रम



नगर – राज्य परिवहन महामंडळाच्या सवलतींसाठी एनसीएमसी कार्ड सक्तीचे करण्याबाबत प्रसारमाध्यमांमध्ये येत असलेल्या परस्परविरोधी बातम्यांमुळे लाभार्थी नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून शासन व राज्य परिवहन महामंडळाने याबाबत तातडीने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी भाजप ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्ष स्वाती सिरसुल यांनी केली आहे. तसेच १ ऑगस्टपासून कार्ड सक्तीची करण्याऐवजी किमान मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

यासंदर्भात प्रसिद्धीपत्रकाद्वारे माहिती देताना सिरसुल म्हणाल्या की, सार्वजनिक वाहतुकीत डिजिटल, पारदर्शक आणि सुलभ व्यवस्था निर्माण करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाने एनसीएमसी कार्ड योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला. मात्र सवलतींसाठी हे कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला राज्यभरातून तीव्र विरोध झाला होता. त्यानंतर काही वृत्तपत्रांमध्ये आणि सोशल मीडियावरील माहितीनुसार हा निर्णय मागे घेऊन जुन्या पद्धतीनेच सवलती सुरू राहतील, असे वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला होता. परंतु अलीकडे राष्ट्रीय स्तरावरील वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांवर १ ऑगस्टपासून एनसीएमसी कार्ड सक्तीचे होणार असल्याच्या बातम्या झळकल्याने लाभार्थ्यांमध्ये पुन्हा संभ्रम आणि चिंता निर्माण झाली आहे.

सेलू (मराठवाडा) येथील प्रसिद्ध झालेल्या माहितीनुसार एनसीएमसी कार्डासाठी शुल्क, किमान शिल्लक रक्कम ठेवण्याची अट, रिचार्जची प्रक्रिया, ग्रामीण भागातील तांत्रिक अडचणी आणि अपुऱ्या सुविधांमुळे अनेक प्रवाशांनी विरोध दर्शविला होता. वाढत्या तक्रारींची दखल घेत जुन्या पद्धतीच्या सवलती कायम ठेवण्याबाबत प्रशासनाने भूमिका घेतल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले होते. मात्र यासंदर्भात अधिकृत स्पष्टता अद्याप मिळालेली नसल्याने नागरिक संभ्रमात असल्याचे सिरसुल यांनी सांगितले.

राज्यातील सुमारे १२ कोटी लोकसंख्येपैकी मोठा वर्ग एसटी महामंडळाच्या विविध सवलतींचा लाभ घेतो. १२ वर्षांवरील महिलांना, ६५ वर्षांवरील पुरुषांना, ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना, विद्यार्थ्यांना, दिव्यांगांना तसेच विविध योजनांअंतर्गत मिळणाऱ्या सवलतींसह सुमारे ३५ प्रकारच्या सवलती लागू आहेत. एका वृत्तानुसार आतापर्यंत सुमारे ५१ लाख नागरिकांनी एनसीएमसी कार्डासाठी नोंदणी केली असून त्यापैकी सुमारे २५ लाख कार्डे कार्यान्वित झाली आहेत. अशा परिस्थितीत उर्वरित कोट्यवधी लाभार्थ्यांची नोंदणी व कार्ड वितरण प्रक्रिया १ ऑगस्टपर्यंत पूर्ण होणार का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.

कार्ड मिळवण्यासाठी अधिकृत केंद्रांवर जाणाऱ्या नागरिकांना, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे सिरसुल यांनी नमूद केले. अनेक वृद्ध व्यक्तींना आरोग्याच्या समस्या, गुडघेदुखी, मणक्याचे विकार किंवा हालचालीतील अडथळ्यांमुळे तासन्तास रांगेत उभे राहणे कठीण जाते. काही लाभार्थी अंथरुणाला खिळलेले असून त्यांच्यासाठी केंद्रांवर जाऊन नोंदणी करणे जवळपास अशक्य असल्याचे त्यांनी सांगितले.

याशिवाय अनेक ज्येष्ठ नागरिकांची बोटांची ओळख (थम्ब इम्प्रेशन) स्पष्ट न मिळाल्याने आधार पडताळणीमध्ये अडथळे निर्माण होत आहेत. डोळ्यांच्या बुबुळाद्वारे ओळख पटविणारी यंत्रणा सर्व केंद्रांवर उपलब्ध नसल्याने लाभार्थ्यांना आधार अद्ययावत करण्यासाठी स्वतंत्रपणे सेतू केंद्रांवर जावे लागत असल्याची तक्रारही त्यांनी केली. काही वर्षांपूर्वी स्मार्ट कार्ड योजनेसाठी अनेक ज्येष्ठ नागरिकांनी शुल्क भरून कार्डे घेतली होती; मात्र त्यांची प्रभावी अंमलबजावणी न होता आता नव्या कार्डासाठी पुन्हा शुल्क आकारले जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढल्याचे त्यांनी म्हटले.

या सर्व पार्श्वभूमीवर अमृत ज्येष्ठ नागरिकांसह इतर लाभार्थ्यांना जुन्या पद्धतीने आधारकार्डावरील वयाचा पुरावा ग्राह्य धरून सवलती सुरू ठेवाव्यात, अशी मागणी होत आहे. तसेच एनसीएमसी कार्ड योजनेतील लाभार्थ्यांची एकूण संख्या, आतापर्यंतची नोंदणी, ज्येष्ठ नागरिकांसमोरील अडचणी आणि संपूर्ण अंमलबजावणीसाठी आवश्यक कालावधी यांचा सर्वंकष विचार करून १ ऑगस्टची मुदत वाढवून किमान मार्च २०२७ पर्यंत सवलत द्यावी, अशी अपेक्षा स्वाती सिरसुल यांनी व्यक्त केली आहे. शासन आणि राज्य परिवहन महामंडळाने याबाबत लवकरात लवकर अधिकृत खुलासा करून जनतेतील संभ्रम दूर करावा, अशी मागणीही त्यांनी केली.

# नगर येथील अभियंता सागर ससाणे यांचे औद्योगिक सुरक्षा क्षेत्रातील उल्लेखनीय यश



सागर ससाणे यांचे औद्योगिक सुरक्षा क्षेत्रातील उल्लेखनीय यश मिळविल्याबद्दल त्यांचा प्लांट हेड अमित लाखे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नगर – येथील अभियंता सागर श्रीकांत ससाणे यांनी शिक्षण क्षेत्रात आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून त्यांनी नुकताच एमएसबीटीई मार्फत ॲडव्हान्स डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी हा अभ्यासक्रम प्रथम श्रेणी विथ डिस्टिंक्शनमध्ये पूर्ण केला आहे. ही त्यांची ११वी पदवी ठरली आहे.

ससाणे यांनी यापूर्वी अभियांत्रिकी व व्यवस्थापन क्षेत्रातील विविध पदव्या मिळवल्या असून त्यामध्ये एम.ई. (मेकॅनिकल – डिझाईन), एमबीए (मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंट), बी.ई. (मेकॅनिकल), डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजिनिअरिंग, बी.ए. (रोड ट्रान्सपोर्ट), पीजीडी इन फायर ॲंड सेफ्टी इंजिनिअरिंग मॅनेजमेंट, डिप्लोमा इन लेबर लॉ ॲंड लेबर वेल्फेअर, डिप्लोमा इन सायबर लॉ, डिप्लोमा इन टॅक्सेशन लॉ तसेच चार्टर्ड इंजिनिअर या पदव्यांचा समावेश आहे.

सागर ससाणे हे गेली १८ वर्षे श्नायडर इलेक्ट्रिक कंपनीत कार्यरत असून त्यांनी सुरक्षा व गुणवत्ता या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांना QCFI आणि CII यांच्या अनेक स्पर्धांमध्ये पुरस्कार प्राप्त झाले असून त्यांना प्रॉमिसिंग इंजिनिअर पुरस्काराने देखील गौरविण्यात आले आहे. या यशाबद्दल प्लांट हेड अमित लाखे, एचआर हेड श्रीकांत गाडे, धनंजय कुलकर्णी, रूपेश राजहंस, राजेंद्र नाईकवाडी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व सहकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

प्लांट हेड अमित लाखे यांच्या हस्ते अभियंता सागर श्रीकांत ससाने यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी एचआर हेड धनंजय कुलकर्णी तसेच अमित रोठे आणि नितीन हुलावले उपस्थित होते.

# गुणवंतांचा गौरव, संस्कारांचा सन्मान आणि समाजसेवेचा वसा; पद्मशाली युवा शक्तीच्या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




नगर – पद्मशाली युवा शक्ती ट्रस्ट व पद्मशाली महिला शक्ती, अहिल्यानगर गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सेवाभावी उपक्रम राबवत असून समाजातील गुणवंतांचा गौरव करण्याची सुंदर परंपरा जपली आहे. या परंपरेचाच एक भाग म्हणून १७ जून रोजी अहिल्यानगरातील तीन तेजस्वी चिमुकल्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कु. रिया रत्नाकर श्रीपत, चि. रुद्र रत्नाकर श्रीपत आणि चि. श्लोक संतोष दोमल यांचा त्यांच्या राहत्या घरी जाऊन शाल, श्रीफळ व गौरवपत्र देऊन गौरव करण्यात आला.

पाईपलाईन हडको येथील रिया आणि रुद्र श्रीपत या भावंडांनी किक बॉक्सिंग या खेळात जिल्हा, राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके मिळवत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या या यशामुळे समाजासह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचा गौरव वाढला आहे.

तर दुसरीकडे, रेसिडेन्शियल हायस्कूलमध्ये इयत्ता पाचवीत शिक्षण घेणाऱ्या श्लोक संतोष दोमल याने सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षा २०२५ मध्ये १०० पैकी ९६ गुण मिळवत राज्यात तृतीय क्रमांक पटकावला आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे त्याची इस्रो येथे शैक्षणिक सहलीसाठी निवड झाली असून विज्ञान क्षेत्रातील त्याची झेप समाजासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

कार्यक्रमात गौरवपत्राचे वाचन व सूत्रसंचालन योगेश ताटी तसेच राष्ट्रपती पुरस्कार विजेते नारायण मंगलारम यांनी केले. श्रीनिवास इप्पलपेल्ली, श्रीनिवास येल्लाराम, सुमित इप्पलपेल्ली आणि विराज म्याना यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दीपक गुंडू, सागर बोगा, योगेश म्याकल, श्रीनिवास इप्पलपेल्ली, नारायण मंगलारप, श्रीनिवास येल्लाराम, अजय म्याना, सतीश चिंता, विराज म्याना, आदेश गुंडू, सुमित इप्पलपेल्ली, योगेश ताटी, सुरेखा विद्दे, उमा कुरापटी, सारिका सिधम, निता बल्लाळ, लक्ष्मी म्याना, रेणुका जिंदम, सुनंदा नागुल आणि वैशाली कुरापटी आदी सदस्यांनी परिश्रम घेतले.

# नगर जल्लोष ट्रस्टकडून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



डोंगरगण व भूतकरवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना नगर जल्लोष ट्रस्टकडून शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

नगर – येथील 'नगर जल्लोष ट्रस्ट' परिवाराच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगण व श्री छत्रपती शिवाजी महाराज म न पा प्राथमिक शाळा भूतकरवाडी, अहिल्यानगर येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे शालेय साहित्य प्रदान करण्यात आले. श्री छत्रपती शिवाजी महाराज म न पा प्राथमिक शाळा भूतकरवाडी येथील शाळेतील ४५ विद्यार्थ्यांना संस्थेचे लौकिक शिंगवी यांच्या वतीने शाळेचे नवीन बूट भेट देण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. तसेच शाळेच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत गुलाबाच्या पुष्परोपाचे भेटवस्तू स्वरूपात वितरण करून सत्कार करण्यात आला. यावेळी नगर जल्लोष ट्रस्टचे सल्लागार समिती प्रमुख सुहासभाई मुळे, किशोर शिंगवी, अध्यक्ष सागर बोगा, विश्वस्थ लौकिक शिंगवी, सचिव अक्षय आंबेकर, सतीश चिंता, खजिनदार दीपक गुंडू, स्तिमित राशीनकर, सुमित ईप्पलपेल्ली, भूपेंद्र चव्हाण, तसेच सौ. पल्लवी बोगा, झिया तेजस कु. ओवी बोगा इत्यादी उपस्थित होते.

कार्यक्रमास गावच्या प्रथम नागरिक तथा प्रशासक सौ.वैशाली मते, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कोमल चांदणे, उपाध्यक्ष रवींद्र कदम, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष शंकर चांदणे, गायत्री चांदणे, सुवर्णा कदम, शाळेचे उपक्रमशील शिक्षक ज्ञानेश्वर चेडे तसेच राष्ट्रीय पुरस्कार विजेते शिक्षक नारायण मंगलारम सर, मुख्याध्यापक अरुण पवार, वर्ग शिक्षिका सौ. ज्योती टाळके यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी वैशाली मते, शंकर चांदणे आणि अक्षय आंबेकर, अरुण पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत समाजातील दानशूर वृत्ती, शिक्षणाचे महत्त्व आणि सामाजिक बांधिलकी याविषयी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन नारायण मंगलारम यांनी केले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सागर बोगा, अक्षय आंबेकर, ओवी बोगा, दीपक गुंडू आणि स्तिमित राशीनकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाबद्दल विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांच्या वतीने चेडे सर यांनी नगर जल्लोष ट्रस्टचे आभार मानले.

# जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन आयोजित निवड चाचणी स्पर्धेचे उद्‌घाटन



जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन आयोजित १७ वर्षा आतील ते १९ वर्षा आतील व खुल्या गटासाठी निवड चाचणी स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले.

नगर – जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन आयोजित १७ वर्षा आतील ते १९ वर्षा आतील व खुल्या गटासाठी निवड चाचणी स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले आहे. या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी असोसिएशनच्या वतीने नेहमीच वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात येतात. या स्पर्धे साठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे विशेष सहकार्य लाभत असते.

निवड चाचणी स्पर्धेत जिंकणाऱ्या मुलांसाठी अहमदनगर बॅडमिंटन असोसिएशनच्या वतीने जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. की जेणेकरून हे खेळाडू राज्यस्तरीय व राष्ट्रीय खेळामध्ये चमकतील. या निवड चाचणी स्पर्धेतील खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेत खेळण्याची संधी मिळणार आहे. असे प्रतिपादन अहमदनगर डिस्ट्रिक्ट बॅडमिंटन असोसिएशनचे खजिनदार राहुल मोटे यांनी केले आहे.

वाडियापार्क क्रीडा संकुल येथे बॅडमिंटन हॉलमध्ये अहमदनगर डिस्ट्रिक्ट बॅडमिंटन असोसिएशनच्या वतीने वयोगट १७ वर्षा आतील ते १९ वर्षा आतील व खुल्या गटासाठी निवड चाचणी स्पर्धा व वयोगट ११,१३,१५ यांच्या साठी जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा १९ व २० जून या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

या बॅडमिंटन स्पर्धेचे उद्‌घाटन नारळ वाढवून करण्यात आले. यावेळी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या बॅडमिंटन स्पर्धेत वयोगट १५ सिंगल्स मध्ये विधी सैनी हिने सुवर्णपदक पटकविल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

या स्पर्धेसाठी मुख्य प्रायोजक योनेक्स सनराईज आणि रायसोनी फाउंडेशनचे विशेष सहकार्य लाभत आहे.

यावेळी ... याप्रसंगी अहमदनगर डिस्ट्रिक्ट बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव मिलिंद कुलकर्णी, खजिनदार राहुल मोटे, सदस्य डॉ.भूषण अनुभुले, चेतन बोगावत, राज्य क्रीडा प्रशिक्षक विशाल गर्जे, मुख्य पंच ऋषिकेश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

या निवड चाचणी स्पर्धे साठी २११ खेळाडूंनी प्रवेशिका नोंदणी केली आहे. तसेच १६० खेळाडूंचा सहभाग असल्याने दोन दिवसात १९३ सामने होतील अशी माहिती बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव मिलिंद कुलकर्णी यांनी दिली आहे.

# आनंदऋषीजी योगा सेंटर

## आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय

प्रथम आपले योग शिक्षक श्री. अनिलजी मेहेर सर यांना मी नतमस्तक होऊन नमन करतो.

मी गेल्या १० ते १२ वर्षापासून आनंदऋषीजी योग सेंटर मध्ये योग क्लासला नियमित येण्याचा प्रयत्न करतो. सकाळची जरी साखर झोप आवडीची असली तरी माझेच मन मला आतून सुनावते की उठा उठा चला योगास जायचे कारण आपणास दवाखान्यापासून किंवा दवाखान्यातील या डॉक्टरांच्या जाळ्यामध्ये अडकायचे नाही.

आणि किती झोप येत असली तरी त्वरीत उठून आवरुन योगास येणे हे महत्वाचेच वाटते. आणि गेल्या कित्येक वर्षात मला आजार आठवत नाही व दवाखान्याची एक गोळी देखील नाही.

आणि सर्वात महत्वाचे म्हणजे मी पूर्वी आमचा इलेक्ट्रॉनिक्स रिपेअरींगचा व्यवसाय असल्याने बैठे कामामुळे मला कंबरदुखीचा आजार बऱ्याच वर्षापासून होता. अनेक दवाखाने करुन काही फरक पडला नव्हता. शेवटी मी आपल्या आनंद योग सेंटर मध्ये नियमित आल्याने मला १००% फरक पडला व योगामुळे माझे शरीर लवचिक झाले. आळस, कंटाळा, थकवा नाहीसा झाला.



तरी माझा इतरांना महत्वाचा सल्ला की योग, व्यायाम, प्राणायाम, नियमित करुन आपण दवाखान्यापासून दूर राहणे, औषध गोळ्या पासून दूर रहावे व नियमित योगास येणे ही सर्वांना विनंती.

– **सतिश पडोळे**, टिळक रोड

